# श्याम कुलकर्णी













# श्यामवाटिका

















# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# श्यामवाटिका

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छाद्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# श्यामवाटिका

श्याम कुलकर्णी





# श्यामवाटिका

**लेखक : श्री. श्याम कुलकर्णी**

पत्ता : द्वारा श्री. जयवंत कुलकर्णी, ’’गन्धार’’फ़्लॅट क्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे ४११०२९
संपर्क – व्हॉट्स ॲप क्र. ९७६५४५६५८१
Email : sgk6642@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १४ जून २०२२ (वटपौर्णिमा शके १९४४)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हे मुक्त व्यासपीठ आहे या पुस्तकात व्यक्त झालेली मते व दिलेली माहिती ही पुर्णतः लेखकाची आहेत. त्यांच्याशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.





# श्री श्याम कुलकर्णी



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E.
1975

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित.





# अनुक्रमणिका

१. संगीतकार पु. ल

२. काही सांगीतिक किस्से!

३. दिल जलता है तो ---!

४. बाबूजी!

५. साहित्यसम्राट

६. गीतारहस्य

७. बाराच्या भावात

८. तेव्हां आणि आता

९. तंबूतला सिनेमा

१०. दिवस बिनाकाचे!

११. अस्मिता आणि असहिष्णुता

१२. मी नाही त्यातला/ली

१३. काय भुललासी ---!

१४. स्पिनोझाचा देव

१५.. चड्डी आणि भारतीय अर्थव्यवस्था



# दोन शब्द

संगीत, साहित्य, काही स्वानुभव व सामाजिक विषयावरचे काही ललित लेख मी लिहिले आहेत त्यांचे एकत्रीकरण या संग्रहात केले आहे त्यामुळे श्यामवाटिका हे शीर्षक! लेखांची संख्या बरीच असल्याने ते एका भागात समाविष्ट न करता तीन भागात त्यांची विभागणी केली आहे. संगीत साहित्याइतकेच मला आवडते त्यामुळे त्यातील काही व्यक्ती व प्रसंग यांवर थोडे लिखाण यात आहे तर साहित्यावर काही समीक्षणात्मक लेखही मी लिहिले आहेत. तिसऱ्या प्रकारात काही स्वानुभव लिहिले आहेत तर चौथ्या प्रकारात काही सामाजिक विषयांवर वा व्यक्तींवर केलेले लिखाण यांचा समावेश होतो. यातील व्यक्त झालेली मते अर्थात माझी स्वत:ची आहेत.

श्याम कुलकर्णी



# १. संगीतकार पु. ल.

" संगीत हे माझे पहिले प्रेम आहे " असे उद्गार स्वत: पु. ल. यानी अनेक ठिकाणी काढले आहेत आणि सुनीताबाईंनीही आपल्या "आहे मनोहर तरी गमते उदास"या पुस्तकात याचा पुनरुच्चार केला आहे.. लहानपणापासूनच पु. ल. हार्मोनियमवर बोटे फिरवायला लागले, त्यापूर्वी ते बासरीही वाजवत होते, तरीही हार्मोनियमने त्यांना अधिक वेड लावले. आणि हा त्यांचा कल लक्षात घेऊन च त्यांच्या वडिलांनी हौसेने भारीपैकी हार्मोनियम त्याना आणून दिली आणि बालपुरुषोत्तमाने बालगंधर्वांसमोर त्यांच्याच नाटकातील पद वाजवून त्यांच्याकडून वाहवा मिळवली. सुरवातीला ते भावगीत गायनाचे कार्यक्रमही करत असत असे त्यानी नमूद करून ठेवले आहे, पण त्यांच्या पेटीवादनाखेरीज त्यांच्या संगीताचा इतरत्र उल्लेख फार कमी आढळतो.




अगदी दोन भागात काढलेल्या भाई चित्रपटामध्येही "कानडा राजा पंढरिचा " या पु. ल. शी काडीमात्रही संबंध नसलेल्या गाण्याला (केवळ त्यापैकी एक गायक पु. लं. चे दोस्त वसंतराव देशपांडे आहेत म्हणून असावे) पु. लं. ना पेटी वाजवायला लावून त्यांचे संगीतप्रेम दाखवले आहे.

पु. लं. नी एकूण फार मोठ्या संख्येने गीते संगीतबद्ध केली नाहीत पण प्रत्येक गाण्यात त्यानी आपले वैशिष्ट्य दाखवले आहे. "गुळाचा गणपती" व "देवबाप्पा" या दोन्ही चित्रपटातील प्रत्येक गाणे अतिशय बहारदार सुरांनी नटलेले आहे. विशेष म्हणजे रागदारीवर आधारित गीते रागाची रुक्षता न येऊ देता त्यांनी स्वरबद्ध केली आहेत. देवबाप्पा चित्रपटातील "करू देत शृंगार :हे चंद्रकंस रागावर आधारित आहे पण ते इतके वेगळे वाटते. त्यात करुण रसाचा पुरेपूर आविष्कार दिसतो. तोच चंद्रकंस "हसले मनि चांदणे" या माणिक वर्मांनी गायिलेल्या भावगीतात एकदम अवखळ वाटतो. तीच गोष्ट "गुळाचा गणपति"मधी केदार रागातील "ही कुणी छेडिली तार " या गाण्याची! त्यावेळी म्हणे पु. लंना केदार रागात गाणं पाहिजे होते व तसे त्यानी ग. दि. मा. ना म्हणताच ग. दि. मानी “केदार म्हणजे काय?” असे विचारले तेव्हा खिडकीतून पु. लंनी त्याना बागेतील एक दृष्य दाखवले आणि त्या फरमाइशीवरून

गदिमानी लगेच “हा घ्या केदार “ म्हणून दिलेलं गाणं हे त्या गाण्याचे आणखी एक वैशिष्ट्य ! या विषयी काही मतभेदही असू शकतील आणि गदिमांच्या शीघ्रकवित्वाविषयी किस्सा म्हणूनही तो सांगितला जात असेल.

याशिवाय भीमसेन जोशींचे गाजलेले भजन "इंद्रायणी काठी " चा भीमपलास काही वेगळाच वाटतो. ’’इथेच टाका तंबू’’ या "गुळाच्या गणपति" तील गाण्यातील संगीतात व चालीत अरेबियन पद्धतीचे सूर वापरून वेगळाच ढंग भरला आहे. "नाच रे मोरा " मधील चाल आणि ताल खरोखरच लहान मुलांना वेड लावणारे आहे पण त्याच बरोबर ते गाणे पूर्ण शास्त्रीय संगीताची बैठक असलेले आहे हे वैशिष्ट्य. "गोरी गोरी पान" या गदिमांच्या गीतास श्रीनिवास खळे यांनी संगीत दिले आणि ते खूपच गाजले तेव्हां गदिमानी खळयांना शाबासकी देताना "अहो खळे, तुम्ही मला सगळया महाराष्ट्रात पोचवले" असे उद्गार काढले तेव्हां खळयांनी मात्र “ नाही हो ते काम पु. लं. नी आधीच केले आहे’’ असे"नाच रे मोरा"या गाण्याचा उल्लेख करून असे उद्गार काढले होते. इतके ते बालगीत जास्त प्रसिद्ध झाले होते, असा उल्लेख आढळतो. "माझिया माहेरा जा " हे जोत्स्नाबाईंचे गीत त्या काळी





प्रत्येक नववधूच्या मनात घोळत असायचे. विशेष म्हणजे पु. ल. तबला व बासरीही उत्तम वाजवायचे असाही उल्लेख आढळतो.

संगीत दिग्दर्शनाकडे पाठ फिरवल्यावरही पं. जितेन्द्र अभिषेकी यांच्याकडून त्यानी "शब्दावाचुन" व "माझे जीवनगाणे" ही दोन अतिशय हळुवार चालीतील भावगीते म्हणून घेतली. सध्या "शब्दावाचुन " काही इतर गानमहर्षीं सध्या सच्च्या सुरावाचून आणि कच्च्या शब्दोच्चारांनी वेगळ्या प्रकारे गाजवत आहेत ते अलाहिदा!

"गुळाचा गणपति" व देवबाप्पा" हे दोनच चित्रपट संगीत दिग्दर्शक म्हणून आपल्याला चटकन आठवतात पण त्याशिवाय तब्बल आणखी नऊ चित्रपटांना त्यानी संगीत दिलेले आहे. ते म्हणजे चोखामेळा, मानाचे पान, मोठी माणसे, नवराबायको, देव पावला, दूधभात, घरधनी, नवे बिऱ्हाड, आणि अंमलदार याशिवाय जोत्स्ना भोळे, माणिक वर्मा व आशाबाई यांच्याकदून त्यानी गाऊन घेतलेल्या भावगीतांची संख्या जेमतेम विशीच्या घरात जाईल. हिंदी चित्रपटसृष्टीत नावाजलेल्या "सज्जाद" या संगीत दिग्दर्शकाने फक्त १५ च चित्रपटांना संगीत देऊनही संगीत दिग्दर्शक म्हणुन त्याला खूप नावाजले जाते. अर्थात सज्जादच्या चित्रपटांची संख्या कमी असण्याचे एक कारण त्याच्या स्वभावातील अहंपणाचा दोष हे कारणीभूत होते. आणि नावाजले जाण्याचेही तेच





कारण आहे. मात्र अकरा चित्रपटांना आणि अनेक भावगीतांना संगीत देऊनही संगीत दिग्दर्शक म्हणून पु. लंना फारसे कोणी नावाजले नाही, त्यात कदाचित त्यांच्या स्वभावातील या क्षेत्राकडे केवळ हौस म्हणून पहाण्याची वृत्ती कारणीभूत असावी.

पु. लंनी विनोदाने आपल्या घरात आपण देशपांडे आणि सुनीताबाई म्हणजे (उप) देशपांडे असे म्हटले आहे, "आहे मनोहर तरी" या पुस्तकात सुनीताबाईंनी "भाई" चित्रपटक्षेत्रात रमले होते हे मान्य केले आहे. आणि त्यांच्या सूचनेवरून त्यानी चित्रपटक्षेत्र सोडले नसते तर " पु, ल. यांची चित्रपट्क्षेत्रातील कामगिरी खूप अधिक झाली असती. गाण्यांना चार चाली अधिक दिल्या असत्या. ------- मुख्य म्हणजे काम त्यांच्या आवडीचे होते. ” हे सुनीताबाईंचेच उद्गार. तरीही हे क्षेत्र त्यानी सोडावे असे सुनीताबाईंनी सुचविले व ते भाईंनी मान्य केले कारण सुनीताबाईंच्याच शब्दात "नट म्हणून भाईने काही चांगल्या भूमिका केल्या हे खरे पण अगदी पहिल्या प्रतीच्या अभिनेत्यात त्याची गणना करता येईल का? संगीतदिग्दर्शक म्हणून त्याने काही फार चांगल्या चाली दिल्या पण त्याच्याच काळातील मराठीतलाच संगीतदिग्दर्शक म्हणून सुधीर फडके भाईहून कितीतरी वरचढ नव्हता का?" थोडक्यात विनोदाने म्हणायला गेल्यास (उप) देशपांडे यांनी यानी त्याना

मारुनमुटकून लिहायला बसवले नसते तर त्यानी कदाचित संगीत क्षेत्र सोडले नसते आणि कदाचित गाजवलेही असते. त्या क्षेत्रात भाई रमत असले तरी त्या क्षेत्रातील विपरीत वृत्ती व माणसे यामुळे" यात भाईचे आयुष्य फुकट वाया जात आहे असे मला त्या काळी प्रकर्षाने वाटले. ते सार्थकी लागावे म्हणून धडपड हेच माझे आयुष्य बनले " असेही सुनीताबाई पुढे म्हणतात. आपण हे बरोबर केले का हा प्रश्न त्यांचा त्यानाच पडला आहे असे त्यांच्या पुस्तकातील काही उद्गारावरून वाटते. तरीही आपल्या संगीताने भाईंनी रसिकाना खूप आनंद दिला हे निश्चित! मला वाटते पं. जितेन्द्र अभिषेकी यांनी म्हटलेली “शब्दावाचुन ---“ व “ माझे जीवनगाणे “ ही पु. ल. नी रसिकांना दिलेली शेवटची संगीत भेट असावी.

पु. ल. नी संगीत दिग्दर्शनच केले असते तर ते कोणत्या उंचीवर पोचले असते हा प्रश्न सुनीताबाईंनी श्रोत्यांच्या कल्पनाशक्तीवरच सोडून दिला हे निश्चित!





# २. काही सांगीतिक किस्से!

प्रसिद्ध संगीतज्ञ केशवराव भोळे यांनी संगीतविषयक खूप लिखाण केले आहे . त्यांचा एक लेखसंग्रह "अस्ताई"मला वाचावयास मिळाला त्यात त्यांनी त्या कालातील गवयांविषयी अतिशय मार्मिक लिखाण केले आहे. त्यातील संगीतात रस असणाऱ्या माझ्यासारख्या व्यक्तीस आवडलेले काही किस्से इतर संगीतप्रेमींनाही आवडतील म्हणून पुढे नमूद केले आहेत. त्यातील बहुतेक ग्वाल्हेर घराण्याविषयीच आहेत. त्यातून गायकांच्या गुणदोषांचे तसेच संस्थानिकांच्या गुणग्राहकतेचेही दर्शन होते.

अकबर बादशहाच्या काळापासून ग्वाल्हेर शहर संगीताचे माहेरघर होऊन राहिले आहे. तानबहाद्दर बडे महंमदखां, हद्दू हस्सूखां, नथ्थेखां निसार हुसेनखां, रहिमतखां, शंकर पंडित असे प्रभावी गायक पदरी





ठेवण्याची प्रथा संस्थान असेतोवर चालत आली होती. आपल्या गायनाचा दर्जा आपल्या मानमरातबाइतका उच्च ठेवण्याबाबतीत हे गायकही तितकेच आग्रही होते. बडे महंमदखां असेच करारी मानी वृत्तीचे होते. त्यांच्या विलक्षण तानबाजीवर खूष होऊन अलिजाबहाद्दुर दौलतराव शिंदे यांनी बाराशे रुपये तनख्यावर दरबारात ठेवले. त्रिंबकराव नावाच्या कारकुनाला यकश्चित गवयाला बाराशे रुपये दिल्याचे पाहून पोटात दुखू लागले. त्याने मग महाराणी बायजाबाईसाहेबांना वश केले आणि महंमदखांना पुढच्या महिन्यापासून फक्त तीनशे रु. पगार मिळेल असा हुकूम काढला. महंमदखां यानी हुकुम हातात पडताच नोकरी सोडून जायची तयारी केली व निघण्यापूर्वी महाराजांचे दर्शन घेऊन जायचे म्हणून देवडीपाशी आले त्यांना आत सोडायला बहुधा त्रिंबकरावच्या सल्ल्यावरून कोणी तयार नव्हते तेव्हां देवडीवरच बसून त्यानी तोडी राग गायला सुरवात केली. हळूहळू देवडीवर ऐकणाऱ्यांची गर्दी तर झालीच पण ते गायन ऐकून माडीवर बसलेल्या महाराजांच्याही डोळ्यातून अश्रुधारा सुरू झाल्या. बारा वाजण्याची वेळ झाली, बायजाबाई विचारावयास आल्या "जेवणखाण काही करायचे आहे की नाही? "इतक्यात गाणे थांबले लगेच महाराजांनी खांसाहेबांना वर बोलावून "या वेळी कसे काय आलात?अहाहा! असा तोडी राग जन्मात

ऐकला नव्हता " असे म्हटल्यावर खांसाहेबांनी तो हुकूम त्यांच्यासमोर ठेवून "आजवर आपले अन्न खाल्ले, त्याबद्दल शुक्रिया पण यापुढे तीनशे रुपयात कुटुंबाचा गुजारा होणार नाही सबब आपल्याला रजा द्यावी, हा शेवटचा मुजरा व शेवटचे गाणे ऐकवावयाला आलो होतो. " असे म्हटल्यावर महाराजांनी हुकूम वाचला व रागाने लाल होऊन त्रिंबकरावाला बोलावले व त्याची खरडपट्टी काढून तिथल्या तेथे तो हुकूम रद्द करायला लावला.

महंमदखां यांच्या मानी स्वभावाची आणखी एक गोष्ट!

त्यांच्याच वेळी ग्वाल्हेर दरबारात लखनौच्या नत्थन पीरबक्ष नावाच्या गायकाचे दोन नातू हद्दू - हस्सूखां नावाचे दोन तरुण गायक होते. नत्थन पीरबक्ष व महंमदखां या दोघांच्या घराण्यात लखनौपासून वैर होते. महंमदखां यांच्या तानबाजीवर दौलतराव महाराज अतिशय खूष होते. तशी तान तयार करण्यास त्यांनी हद्दूहस्सूखां यांना सांगितले. महंमदखां यांच्याशी वैर असल्याने त्यांच्याकडून शिकणे शक्य नव्हते तेव्हां हद्दू हस्सूखां यांनी त्यांचे गाणे कानावर पडावे अशी विनंती केली व महाराजांनी महंमदखां गात असताना या दोघांना पलंगाखाली लपवून त्यांचे गाणे ऐकवण्याची युक्ती केली. मग सहा महिन्यांनी महाराजांनी मोठा जलसा करवून त्यात हद्दू हस्सू खां यांना महंमदखां यांचे गाणे





ऐकवण्याचा हुकूम केला. त्यांनी अगदी हुबेहूब महंमदखां यांचे गाणे ऐकवल्यावर महंमदखां यांचा रागाचा पारा चढला व "माझ्याशी याबाबतीत दगा झाला आहे आता मी याठिकाणी नोकरी करणार नाही "असे म्हणून बाराशे रुपये पगार देणाऱ्या नोकरीवर लाथ मारून ते रेवा संस्थानात गेले व पुन्हा ग्वाल्हेरचे तोंड त्यांनी पाहिले नाही.

महाराज हेही गायनाचे अत्यंत शौकीन! वरील गायकांकडून महाराज स्वत: त्यांचे शागीर्द होऊन शिकत असत. हद्दूखांनी अति मेहनतीने आपला आवाज तयार केला होता व म्हातारपणीही त्यांची रोज सहा तासांची मेहनत चालू असे. " एवढी कसरत आता तुम्ही कशाला करता?"असे कोणी विचारले तेव्हां ते म्हणाले, "मी म्हातारा झालो असे कोणी म्हणाले तरी चालेल पण माझे गाणे म्हातारे झाले असे कोणी म्हणू नये. "इतके जोरकस ते गात असत. लखनौ येथे असताना एक दिवस मेहनत करत असताना यांच्या जबड्याच्या तानेचा गडगडाट ऐकून तळमजल्यावर बांधलेला घोडा ठाणबंद तोडून पळून गेला अशी आख्यायिका आहे. मियां हद्दूखांचे संगीतप्रेम इतके विलक्षण होते की, संगीताच्या रियाजामध्ये कसलीही अडचण येऊ नये म्हणून पुष्कळ वर्षे त्यांनी लग्न केलेच नाही.





बडे गुलाम अल्लींचे चुलते व वडीलही असेच रियाज करण्याचे महत्व जाणत होते. योग्य काळी त्यांची लग्ने ठरली व रिवाजाप्रमाणे मेजवानीसाठी लागणारे सर्व साहित्य मुख्यत: तूप, रवा, बदाम, पिस्ते . खारीक, बेदाणे इ. त्यांच्या घरी आणून ठेवलेले. रात्री हे दोघे भाऊ त्या सामानाकडे पहात बसलेले असताना एक भाऊ दुसऱ्याला म्हणतो "सामान तो खूब इकट्टा हुआ है"

"हां मेहनत करनेके लिये यह छ: महिनेतक जाएगा"

"फिर क्या इरादा है?"

"अरे भाई शादी तो कभी भी हो सकती है --- लेकिन यह सामान देखकर और छ: महिने मेहनत करनेको जी चाहता है---"

आणि दुसऱ्या दिवशी लग्न लांबणीवर टाकल्याचा निश्चय या दोघा भावांनी जमातीला कळवला व दुप्पट जोराने रियाज सुरू केला.

रियाजाविषयीच प्रख्यात सारंगीवाले म. कादरबक्ष आपल्या वडिलांची गोष्ट सांगत. कादरबक्षांची मातु:श्री एके दिवशी सकाळीच वारली तेव्हां ते कळवायला ते शिष्याच्या घरी तालीम चालू असताना गेले आणि रडत रडत वडिलांना ती बातमी सांगितली. तेव्हां "अबे बेवकूब, रोता क्या है?जाओ भाई बिरादरीको बुलाओ, सब तय्यारी करो, फिर मुझे बुलाने आओ"असे त्यांना खडसावून काही विशेष झालेच





नाही असे समजून त्यानी तालीम पुढे चालू ठेवली. मुसलमान गायकांविषयी केशवराव भोळे यांनी व्यक्त केलेले मत असे आहे की ते सर्वस्वाचे अर्पण करून रियाज करतात. "खूब खाना और दिनरात रियाज करना "हाच त्यांचा मंत्र! वरील दोन किस्से याची साक्ष देतात.

आपल्या घराण्याच्या गायकीविषयी काही गायक किती हट्टी होते (कट्यार काळजात घुसली"चे सूत्र) त्याविषयी हद्दूखां यांची आठवण अशी आहे. त्यांच्या वेळी ग्वाल्हेर दरबारात इनायतखां म्हणून दुसरे एक गवई नोकर होते. त्यांच्या अंगचे गुण पाहून व संगीत ऐकून हद्दूखांनी त्याना आपले जावई करून घेतले. इनायतखांही आनंदाने जावई झाले--- हेतु हा की, दरबारात अन्नदात्यांनी मानलेली हद्दूखांची गायकी आपणास मिळावी. पण हद्दूखांच्या लक्षात ही गोष्ट येताच "मुलगी दिली म्हणून गायकी देणार नाही" असे त्यानी स्पष्टपणे सांगितले. शेवटी दरबारातील वैद्यराज मोठे प्रेमळ व संगीतप्रेमी असल्यामुळे व त्यांचा इनायतखान यांच्यावर लोभ असल्यामुळे त्यानी हद्दूखांशी संधान बांधले व ते हद्दूखांकडून तालीम घेऊ लागले व नंतर इनायतखांनी वैद्यबुवांना सतार शिकवायची व हद्दूखांची गायकी वैद्यबुवांनी इमायतखांना शिकवायचे असे ठरून इनायतखान यांनी ग्वाल्हेर घराण्याची गायकी संपादन केली.



निस्सार हुसेनखां हे ग्वाल्हेर घराण्याची गायकी कायम ठेवणारे गायक व रामकृष्ण वझेबुवांचे उस्ताद. ते महाराष्ट्रात येऊन राहिले होते. त्यांची स्मरणशक्ती तीव्र असंख्य चिजा सहज पाठ झाल्या. त्यांची राहणी ब्राह्मणी पद्धतीची होती. गळ्यात जानवे घालीत व श्रावणी सोमवारचा उपास करत. लहानपणी शास्त्री पंडितांकडून शिक्षण, भागवतातील श्लोक व मोरोपंतांच्या आर्या पाठ. त्यामुळे त्यांची वाणी शुद्ध व सुसंस्कृत झाली त्यामुळे त्यांची जात ओळखून येत नसे. "मला मागील जन्मी गायन शिकण्याची इच्छा झाली म्हणून मी मुसलमान झालो व विद्या शिकलो आता ती इच्छा पूर्ण झाली तेव्हां पुढील जन्म ब्राह्मणाचे पोटी घेणार असे म्हणून गळ्यातले यज्ञोपवित दाखवीत.

वर उल्लेखलेल्या हद्दू - हस्सूखांपैकी हस्सूखां अशा करारीने गायचे की त्यानी आपल्या कलेचा दर्जा राखण्याकरिता स्वत:च्या प्राणांचीही पर्वा केली नाही. एकदा एका महफिलीत सूडबुद्धीने दरबारी गायक बडॅ महंमदखानी ( या महंमदखां यांची गायकी त्यांचे गाणे चोरून ऐकून हद्दूखांनी कंठस्थ केली होती त्याचा हा राग. ) त्यांची खूप तारीफ करून ज्या मिया मल्हाराच्या चिजेत ’कडक बिजलीची तान’ आहे ती चीज म्हणण्याची फरमाइश केली. अस्ताई अंतरा चांगला घोळून तानबाजीस सुरवात केल्यावर कडक बिजलीची तान घेऊन महंमदखान





यांचेकडे हस्सूखांनी पाहिले. तेव्हां महंमदखान म्हणाले, "बेटा ठीक है, और एक दफे लेना"तेव्हां हस्सूखांने मोठ्या जोराने ती पुन्हा घेतली. पण काय त्याबरोबर डाव्या अंगाची फासळी चढली व रक्ताची उलटी झाली. त्यांचे आजोबा नथन पीरबक्षानी शेल्याने ती फासळी बांधून म्हटले, "बेटा आज तरी मरावयाचेच, उद्या तरी मरावयाचेच! मग तान घेऊनच मर! तसा मरू नकोस. तुझे नाव तरी होईल" नातवाने (हस्सूखांने) महंमदखांचे कपट ओळखून, चिडून सही सही तशी तान घेतली ! श्रोतृमंडळींनी वाहवा केली पण काय हस्सूखां खाली पडले आणि तत्काळ गतप्राण झाले. कलेच्या इभ्रतीसाठी प्राण देणाऱ्या कलावंताचे दुसरे नाव जगातील कलेच्या इतिहासात सापडेल काय?





# ३. दिल जलता है तो ---!

२७ ऑगस्ट १९७६ या दिवशी आपल्या कारकीर्दीच्या शिखरावर असताना हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने एका सुरेल गायकाचा अचानक अंत झाला. आपले "दिल जलता है तो जलने दो " हे गीत त्याने नुकतेच गाइले होते. लतादीदीबरोबर अमेरिकेतील डेट्राइट या शहरात त्याचा दौरा चालू होता आणि तो दौरा अर्धवट टाकूनच आपल्या जीवनाचा निरोप त्यास घ्यावा लागला होता.

२२जुलै १९२३ या दिवशी मुकेशचन्द माथुरचा जन्म पंजाबातील लुधियाना शहरी झाला. पिताजी जोरावरचन्द माथुर आणि त्यांच्या पत्नी चान्द रानी यांचे हे सहावे अपत्य. त्याच्याहून लहान आणखीही चार भावंडे त्याला होती. वडील अभियंता होते. दिल्लीत रहात होते.





लहानपणापासूनच मुकेशला गाण्याचे फार वेड! आणि आवाजही चांगला होता. त्या काळात तरुण पिढीचे दैवत म्हणजे के. एल. सहगल आणि मुकेशला त्याच्याच गाण्याचे वेड. आपल्या खोलीत बसूनच त्याचे गायन चालायचे! मुकेशची बहीण सुंदर प्यारीला संगीत शिकवायला येणाऱ्या मास्टरजीना शेजारच्या खोलीत बसून त्यांचे संगीत ऐकणारा मुकेशच चांगला शिष्य होऊ शकतो हे ध्यानात आले. त्यांच्याकडून जी काय तुटपुंजी संगीताच्या ज्ञानाची शिदोरी मिळाली तेवढेच काय ते मुकेशचे संगीतशिक्षण. मधून मधून आपले कौशल्य छोट्या छोट्या मैफिलीतून तो मित्रमंडळींसमोर पेशही करायचा. पण संगीत हा पोटापाण्याचा व्यवसाय होऊ शकतो हे जोरावरचंद यांना मान्य नसावे त्यामुळे दहाव्या इयत्तेनंतरच शिक्षण सोडून सार्वजनिक बांधकामखात्यात त्यानी मुकेशला चिकटवून दिले. पण तेथे राहूनही आपला संगीताचा व्यासंग त्याने चालू ठेवला आणि काही वाद्यांवरही प्रभुत्व मिळवले.

त्याच काळात एका लग्नात त्याच्या नात्यातच असलेले मोतिलाल मुंबईहून आलेले होते आणि त्यांच्यासमोर "पहा आमचाही बच्चा कसा गातो " असे म्हणून मुकेशला गाण्यासाठी त्याच्या नातेवाइकानी पुढे ढकलले. मोतिलाल चित्रपटक्षेत्रात नावाजलेले अभिनेते होते आणि



थोडेफार गातही होते. त्यामुळे मुकेशचे गाणे त्याना बरेच भावले आणि त्याला आपल्याबरोबर मुंबईस घेऊन जायला तयार झाले. आपल्या घरी त्याची रहायची सोय करून मोतिलाल यांनी त्यांना पंडित जगन्नाथ प्रसाद यांचेकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षण मिळावे अशी योजनाही केली पण त्याचबरोबर आपला मार्ग स्वत:च शोधावा असा सल्लाही दिला.

त्याकाळात पार्श्वगायनाची पद्धत फारशी रूढ झालेली नव्हती व मुकेशला गोड गळ्यानरोबरच रुबाबदार व्यक्तिमत्वही लाभले असल्याने शिवाय मोतिलाल यांचे अप्रत्यक्ष का होईना सहाय्य होतेच त्यामुळे फारसा संघर्ष करावा न लागता "निर्दोष"या १९४१ मध्ये निर्मिती झालेल्या चित्रपटात गायक नट म्हणून त्याला प्रवेश मिळाला. "दिलही बुझा हुआ हो तो" हे त्याचे पहिले चित्रपट गीत. त्या चित्रपटात नलिनी जयवन्तबरोबर त्याने भूमिका केली होती आणि संगीत दिग्दर्शक अशोक घोष यानी चित्रपटास संगीत दिले होते. पण तो चित्रपट काही खास चालला नाही आणि काही काळ मुकेशला संधीची वाट पहाणे नशिबी आले पण त्या काळात त्याने पार्श्वगायन हेच आपले क्षेत्र आहे हे जाणून त्यातच स्वत:ला झोकून द्यायचे असा निर्णय केला..

चित्रपट जरी यशस्वी झाला नाही तरी चित्रपटातील हीरो आणि गायक असा दुहेरी प्रभाव चित्रपटशौकिनांवर पडल्याशिवाय थोडाच





रहातो, पण चित्रपटात प्रवेश करण्यापूर्वीच मुकेशच्या व्यक्तिमत्वाची जादू सरला नावाच्या उमलत्या कळीवर पडली आणि मुकेशचेही दिल तिने घायाळ केले. पण या दोन प्रेमी जनांचे मीलन होण्यात बरेच अडथळे होते. पहिला प्रमुख अडथळा म्हणजे सरला ही त्रिवेदी या गुजराती ब्राह्मण कुटुंबातली तर मुकेश पंजाबदा पुत्तर आणि त्यात कायस्थ म्हणजे त्रिवेदींच्या दृष्टीने कनिष्ठ जातीचा . त्यावेळी मुकेश घरदार नसणारा आणि आर्थिक प्राप्तीही बेताचीच असलेला. शिवाय सिनेमातील माणूस म्हणजे भानगडीचाच असणार हे समीकरण रूढ होतेच. याउलट रायचन्द त्रिवेदी म्हणजे सरलाचे पिताजी लक्षाधीश. अश्या सगळयाच गोष्टी अगदी प्रतिकूल त्यामुळे त्यांच्याकडून लग्नास मान्यता मिळणे शक्यच नव्हते. उलट सरलाच्या प्रेमप्रकरणाचा सुगावा लागताच तिला घराबाहेर पडण्याचीही बंदी घालण्यात आली होती . श्रावणातील सोमवार म्हणून शिवमंदिरात जाण्याची मिळालेली मुभाच काय ती तिला लाभलेली संधी आणि तिचा बरोबर वापर करत तिने आणि मुकेशने कान्दिवलीच्या शिवमंदिरात मोतिलाल यांच्याच उपस्थितीत लग्नाचा बेत पार पाडला. तो दिवस होता २२ जुलै १९४६! मुकेशचा २३ वा वाढदिवस त्याच दिवशी होता. हे लग्न काही फार टिकणार नाही असा सगळयांनाच वाटत होते. पण मुकेशच्या अंतापर्यंत





त्यानी एकमेकास साथ दिली. तोपर्यंत त्याचा परिवार दोन मुलगे आणि तीन मुली असा बहरलाही होता. त्यातील नितिन यानेही वडिलांचा कित्ता गिरवला.

पार्श्वगायक म्हणून मुकेशची खरी ओळख झाली ती मोतिलाल यांच्याच १९४५ मध्ये निघालेल्या "पेहली नजर" या चित्रपटामुळे. आह सितापुरी यांनी लिहिलेल्या गीतांना अनिल विश्वास यानी त्या चित्रपटास संगीत साज चढवला होता. अनिलदांच्या समोर मोतिलालनी मुकेशला सादर करून "याला एक संधी गाण्याची देऊन पहा"असा आगह केला आणि मुकेशचे गाणे ऐकल्यावर अनिलदांनाही वाटले की "आहे, पोरात काहीतरी चमक आहे" पण चित्रपट निर्माता मझर याला हा निर्णय पसंत नव्हता. कारण यापूर्वीचा मुकेशचा 'निर्दोष' चालला नव्हता"या नव्या पोराला घेऊन माझ्या पिक्चरचे वाटोळे करायचे नाही मला. " असे त्याने स्पष्ट बजावले. अर्थात मोतिलालना हे आवडले नाही. खरे तर "माझी गाणी मुकेश म्हणेल अशी त्यांची प्रथम अटच होती. पण अडॅलतट्टू निर्मात्यापुढे त्याचे काही चालले नाही म्हणून त्यानी "ठीक आहे तर मग माझी गाणी मीच म्हणतो. " असा आपला निर्णय सुनावला आणि निर्मात्याला तर नट म्हणून मोतिलालच हवा असल्याने त्याला हे मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हते. आता अनिलदांवर मात्र हे एक संकटच



आले, कारण मुकेश ऐवजी मोतिलालकडून गाणे म्हणवून घेणे म्हणजे त्यांच्या दृष्टीने आगीतून फुफाट्यात पडण्यासारखेच होते. त्यामुळे त्यानी "दोघांचेही राहू द्या मोतिलालची गाणी मीच म्हणतो" असे निर्वाणीचे अस्त्र काढले. यालाही निर्मात्याची काही हरकत नव्हती.

यात बिचारा मुकेश आपली एवढी चांगली संधी गेल्यामुळे जाम वैतागला व "संगीत दिग्दर्शकच गाणी म्हणू लागले तर आमच्यासारख्यांचे काही खरे नाही "असे म्हणू लागला. त्याचे हे उद्गार अनिलदांच्या कानावर गेले. तसे त्यांनाही मुकेशला संधी द्यावी असे वाटतच होते शेवटी त्यानी मुकेशला व निर्मात्याला बोलावून घेतले आणि निर्मात्याला सांगितले "याच्याकडून आपण गाणी म्हणून घेऊ आणि जर तुला पसंत पडलीच नाहीत तर मी ती पुन्हा म्हणेन आणि मगच ती आपण चित्रपटात टाकू" निर्मात्याने कसाबसा होकार दिला. आणि शेवटी सगळी गाणी मुकेशच्या आवाजातच तयार झाली.

पण त्यातही "दिल जलता है तो जलने दो" निर्मात्याला काही केल्या पसंत पडेना ते गाणे पिक्चरमधूनच काढून टाकण्याचा त्याने हट्ट धरला शेवटी अनिलदांनी चित्रपट रिलीज झाल्यावर एक आठवडाभर वाट पहा आणि जर ते गाणे प्रेक्षकांना पसंत पडले नाही तर दुसऱ्या आठवड्यात ते काढून टाका अशी तडजोड करण्यास त्याला तयार केले





. चित्रपट प्रदर्शित झाला आणि "दिल जलता है" याचे गाण्याला जनतेने डोक्यावर घेतले आणि ते काढून टाकण्याचा प्रश्नच उरला नाही. आणि त्याचबरोबर मुकेशचे गायक म्हणून स्थान निश्चित झाले.

मुकेशवर त्या काळातील प्रसिद्ध गायक नट कुन्दनलाल सहगल यांचा अतिशय मोठा प्रभाव होता तो सदैव आपल्या संगीतातील या दैवतासारखाच गाण्याचा प्रयत्न करायचा. असं म्हणतात की"दिल जलता है तो जलने दो" हे त्याने गाइलेले गीत ऐकल्यावर"आश्चर्य आहे, मला तर मी हे गीत म्हटल्याचे आठवतही नाही"असे उद्गार स्वत: सेहेगलनीच काढले. त्यावेळी रेकॉर्डवर गायकाचे नाव नसे. या गाण्याविषयी आणखी एक काळीज हेलावून टाकणारी गोष्ट म्हणजे डेट्रॉइटला झालेल्या कार्यक्रमात मुकेश यानी हे गाणे म्हटले आणि त्यांचे हे शेवटचेच गीत ठरले.

मुकेशला सेहगलच्या प्रभावाखालून मुक्त करण्याचे श्रेय नौशाद यांच्याकडे जाते. मुकेशला त्यांनी स्पष्ट सांगितले, "तुला पब्लिककडून वहावा मिळाली आहे पण खरे तर ती ’मुकेश’ला नाही तर ’के. एल. सहगल’ला मिळाली आहे जर मुकेश म्हणून आपली कारकीर्द घडवायची असेल तर तुझ्या पद्धतीने तुला गायला पाहिजे. "असे त्यानी त्याला बजावले पण त्याचबरोबर एक गमतीची गोष्ट म्हणजे





"अन्दाज"मध्ये त्यानी दिलिपकुमारची गाणी मुकेशकडून गाऊन घेतली आणि राजकपूरची रफीकडून. पण पुढे मात्र मुकेशने जरी बहुतेक सर्व नायकांना आवाज दिला असला तरी त्याची जास्त प्रसिद्धी राजकपूरसाठी केलेल्या पार्श्वगायनामुळेच झाली व तो राजकपूरचा आवाज म्हणून ओळखला गेला. आणि त्यांची दोस्तीही इतकी खास होती की मुकेश गेल्याचे कळल्यावर राजकपूरला अश्रू आवरले नाहीत. "आज मेरी आवाज चली गयी" असे उद्गार त्याने काढले.

. मुकेशच्या आवाजास एक विशिष्ट बाज होता. तॉ आवाज खरोखर त्याच्या काळजातूनच आला आहे असे वाटे. पण तरीही शास्त्रीय संगीतावर आधारित गाणी म्हणण्यास त्याचा आवाज अनुकूल नव्हता असेच म्हणावे लागेल. तसा शास्त्रीय संगीताचा अभ्यासही त्याला करता आला नव्हता. संगीतदिग्दर्शकांनाही याची कल्पना असल्यामुळे शंकर जयकिशनसारख्या मुकेशभक्त संगीतदिग्दर्शकांनी देखिल एकादेच रागदारीवर आधारित "मतवाली नार " सारखे गाणे त्याच्याकडून म्हणून घेण्याचे धाडस केले शंकर जयकिशन यांचे सहाय्यक व नंतर पूर्णपणे संगीतदिग्दर्शक झालेल्या दत्ताराम यानी मात्र "आसू भरी है "सारखे पूर्णपणे शास्त्रीय म्हणता येईल असे गाणे मुकेशकडून फारच उत्तम पद्धतीने म्हणून घेतले आहे. तीच गोष्ट "मुझे



तुमसे कुछ भी ना चाहिये "(कन्हैया) या गाण्याबद्दल म्हणता येईल. पण अशी गाणी अपवादच! राजकपूरच्याच "दिल ही तो है" चित्रपटात इतर सर्व गाण्यांसाठी मुकेशचा आवाज वापरणाऱ्या रोशन याना"लागा चुनरिमे दाग " गाण्यासाठी मात्र मन्ना डेचा वापर करावा लागला.

सचिनदेव बर्मन, सलिल चौधरी यांनी त्याच्या आवाजातील दर्द अचूकपणे वापरून "चलरी सजनी ""कही दूर जब दिन "अशी अविट गोडीची गाणी बनवली. नौशाद यांनीही मुकेशचा वापर अश्याच पद्धतीने करून त्यातील विशिष्ट उच्चारपद्धती गाण्याची गोडी वाढवू शकेल अश्या पद्धतीने वापरला. पण तरीही या संगीतदिग्दर्शकांबरोबर मुकेशची अतिशय थोडी गाणी आहेत.

कल्याणजी आनंदजी, शंकर जयकिशन व त्यानंतर लक्ष्मी- प्यारे ही जोडी हे मुकेशचा घाउक वापर करण्यात अधिक आघाडीवर होते, त्यात शंकर जयकिशन यांनी संगीत दिलेल्या चित्रपटात राजकपूरचेच बरेच आहेत पण तसे कल्याणजी आनंदजी यांच्याबाबतीत नसले तरी त्यानी मुकेशचा अधिक वापर केला आणि तो कोठेही अयोग्य वाटला नाही. लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्याही बाबतीतही असेच म्हणता येईल. त्यांनीही मुकेशचा आवाज तेवढ्याच मोठ्या प्रमाणात वापरला आहे.

त्याखालोखाल त्याचकाळात रवी, आणि चित्रगुप्त यांनीही मुकेशचा आवाज वापरला आहे.

" वो सुबह फिर कभी तो आयेगी" किंवा "आ अब लौट चले" "ओठोंपे सचाई रहती है" "सब कुछ सीखा हमने" "जीना यहां मरना यहां "अशी काही गाणी अशी आहेत की ती इतर कोणी म्हटल्याची कल्पनाही आपण करू शकत नाही. ती चित्रपटात राजकपूरने म्हटली आहेत हे वेगळेच. पण यहुदीमधील "ये मेरा दीवानापन है" किंवा "सारंगा तेरी यादमे" किंवा "दिल ढूंढता है"ही गाणी राजकपूरने म्हटली नसूनही मुकेशनेच म्हणायला हवी होती हे मान्य करावे लागेल. "सुहाना सफर " या दिलीपकुमारसाठी म्हटलेल्या गाण्यात जो ताजेपणा जाणवतो तो अगदी वेगळाच त्यावेळी हाच का दर्दभरी गीते गाणारा मुकेश असे वाटते.

ओ. पी. नय्यर, मदनमोहन व सी. रामचंद्र या त्या काळातील महत्वाच्या संगीतदिग्दर्शकांनी मात्र मुकेशच्या आवाजात फारच कमी गाणी संगीतबद्ध केलेली दिसतात. पण त्याचबरोबर कारकीर्दीची सुरवात करून देणाऱ्या अनिलदा व सैगलच्या प्रभावातून मुक्त करणाऱ्या नौशाद यांच्या संगीत दिग्द्रर्शनाखालीही मुकेशने खूपच कमी म्हणजे अनुक्रमे १९ व २६ गाणीच म्हटली आहेत. रोशन यांनीही मुकेशचा

आवाज कमीच वापरला पण त्याच्याकडून गाऊन घेतलेली सर्व गाणी गाजली.

मुकेशने अभिनेता व निर्माता या भूमिकाही पार पाडण्याचा थोडा प्रयत्न केला पण त्यात त्याला काही फार यश लाभले असे म्हणता येत नाही. आपल्या दीर्घ कारकीर्दीत मुकेशने कमीच (तेराशेच्या आसपास) गाणी गाइली. (एक मराठी गाणेही त्याने गायले आहे. सप्तपदी चित्रपटातील "एकदा येऊन जा")त्याचे एक कारण म्हणजे १९५१ मध्ये त्याने स्वीकारलेला "माशुका"हा चित्रपट, त्यात त्याने भूमिका केली होती व करारानुसार तो चित्रपट पूर्ण होईपर्यंत इतरत्र कोठे कसलेच काम न करण्याची अट चुकून मान्य करून बसला . आणि त्याचा कालावधि बराच लांबला. ’अनुराग’ हा एक चित्रपटही त्याने काढला व त्याचे संगीतही दिले पण या गोष्टी त्याच्या कारकीर्दीस फायदेशीर न ठरता त्या काळात मुकेशने गायन संन्यास घेतला असा गैरसमज होऊन त्याची त्याला मोठीच झळ बसली.

एक व्यक्ती म्हणून मुकेशचा सच्चेपणा त्यांच्या आयुष्यातील एका घटनेवरून समजतो. त्या काळात स्टेजशोज करण्यास त्याने सुरवात केली होती . मॉरिशसहून एक व्यक्ती त्याचे स्टेजशोज आयोजित करण्यासाठी आली होती व त्याला भेटण्यासाठी मुकेश आपल्याबरोबर



१२-१३ वर्षाच्या नितिनला घेऊन गेला. करार करण्यासाठी आलेल्या व्यक्तीने मुकेशला ३००० रु (त्यावेळी त्याचे मूल्य बऱ्यापैकी होते) अनामत म्हणून दिले त्यावेळी मुकेशने ते पैसे तसेच आपल्या मुलाच्या हातात देऊन म्हटले, "बेटा ही रक्कम तू घे. शो अजून तीन महिन्यानंतर आहे. मधल्या काळात जर माझे काही बरे वाईट झाले तर हे पैसे कोणी दिले होते त्याला परत करण्याची जबाबदारी तुझी राहील" हे ऐकून बिचारा नितिन रडायलाच लागला. अर्थात तसे काही झाले नाही. पण पुढे बऱ्याच वर्षानंतर तसेच घडायचे होते आणि दौरा चालू असतानाच मुकेश जग सोडून गेला.

चार वेळा फ़िल्मफ़ेअर ऍवॉर्ड, तीन वेळा बेंगाल फिल्म जर्नॅलिस्ट ऍवॉर्ड व एकदा नॅशनल फिल्म ऍवॉर्ड ने मुकेशला भूषवण्यात आले. आज मुकेशला जाऊन ४१ वर्षे होत आहेत तरी त्याने गायलेली गीते रसिकांच्या काळजावर दीर्घ काल राज्य करत रहाणार यात शंकाच नाही.



# ४. बाबूजी!

जुलै महिन्याची २५ तारीख असून रेडिओवर "खुष है जमाना आज पहेली तारीख है" हे गाणे वाजू लागल्यामुळे मी एकदम चक्रावून गेलो मी सेवानिवृत्त झालो तरी इतके काळचे भान विसरलो यावर विश्वास बसेना पण तेवढ्यात निवेदकाने आज बाबूजी म्हणजे सुधीर फडके यांचा जन्मदिन(२५ जुलै) आहे म्हणून हे गाणे लावले असे सांगून माझी संशयनिवृत्ती केली. सन १९५४ मधील "पहली तारीख" याच नावाच्या चित्रपटातील हे गाणे ! रेडिओ सीलोनने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस हे गाणे लावण्याचा प्रघात कधी सोडला नाही आणि आता एफ एम चॅनेलनेही ती परंपरा चालवली आहे आज त्रेसष्ठ वर्षानंतरही ते तितकेच आनंददायक वाटते, त्याला किशोरकुमारची शैली कारणीभूत आहे, तितकीच बाबूजींनी दिलेली मजेदार चालही!

अतिशय हलाखीत बालपण गेलेल्या बाबूजींनी संगीत हेच आपले ध्येय ठरवले होते हे निश्चित. कोल्हापूर या आपल्या जन्मस्थानी वामनराव पाध्ये यांच्याकडे त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. आणि वडील अचानक





गेल्यामुळे घर सोडून अर्थप्राप्तीसाठी देशभरात अक्षरश: दारोदार फिरून आपली उपजीविका करण्याची पाळी त्यांच्यावर आली. तश्याही स्थितीत त्यांनी किती कठोर परिश्रम करून आपले स्वत्व राखले याची कहाणी त्यांच्याच शब्दात त्यांच्या "जगाच्या पाठीवर" या आत्मवृत्तपर पुस्तकात वाचायला मिळते. पण त्यांच्या निर्लेप वृत्तीमुळेच की काय या आत्मवृत्ताचा पुढील भाग ज्यात त्यांच्या कर्तृत्त्वाचा भाग वाचायला मिळाला असता तो त्यानी लिहिला नाही याबद्दल हळहळ वाटते.

भावगीतगायक अशीच प्रसिद्धी मिळत असताना प्रभात कंपनीत संगीत दिग्दर्शक म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरवात त्यांनी १९४६ या वर्षी निघालेल्या "गोकुल" या चित्रपटापासून केली. हिंदी चित्रपटसृष्टीतील मानापमानाचे प्रयोग त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीस मानवले नाहीत असे दिसते शिवाय मराठी चित्रपटसृष्टीत त्याना मानाचे पान मिळत असल्यामुळेही त्यानी तिकडे दुर्लक्ष केले असावे त्यामुळे त्यांनी संगीत दिलेल्या १०१ चित्रपटांमध्ये हिंदी चित्रपटांची संख्या फक्त २१च आहे.

भावगीत गायक ही त्यांची ओळख त्यांनी कायम ठेवली आणि बऱ्याचवेळा त्यांच्या इतर संगीतकारांच्या बरोबर केलेल्या गीतगायनाचीच जास्त आठवण आपल्याला होते. "डोळयामधले आसू पुसती" किंवा "कुठे शोधसी रामेश्वर" किंवा "तिन्ही लोक आनंदाने " अशी त्यांची भावगीते अतिशय कर्णमधुर झालेली आहेत. त्या गायनाच्या वेळी आपण संगीतकार नसून केवळ गायकच आहोत व संगीतकाराला अभिप्रेत भावच आपल्या गायनातून



दिसायला हवा याविषयी ते किती दक्ष असत याविषयी संगीतकार यशवंत देव यांनी लिहूनही ठेवले आहे.

बाबूजींचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना चाल फारच चटकन सुचत असे . त्याविषयी त्यांया गीतरामायणातील पहिल्याच गीताची आठवण सांगण्यासारखी आहे.. हे गीत तयार करून आपण बाबूजीना दिले असा गदिमांचा समज तर ते आपल्याला मिळाले नाही असा बाबूजींचा दावा (आणि बाबूजीच्या व्यवस्थितपणाचा विचार केल्यास तो खराही असणार) आता आपण पुन्हा गीत करणार नाही असा अण्णां(गदिमां)चा हट्ट पण आकाशवाणीचे काम त्यामुळे अडलेले! कारण गीत आकाशवाणीवर प्रसारण करण्याचे वेळापत्रक जाहीर झालेले! ते दुसऱ्या दिवशी सकाळी आकाशवाणीवर प्रसारण व्हायचे ठरलेले व ध्वनिमुद्रणासाठी आधल्या दिवशी रात्री सर्व कलाकार जमलेले असताना उद्भवलेला हा वाद.

शेवटी आकाशवाणीचे पु. मं. लाड यांनी अण्णांना एक खोलीत अक्षरश: कोंडून आता गीत तयार झाल्यावरच दार उघडण्यात येईल असे सांगितले. मधून मधून चहाचे कप पाठवण्यात येतील एवढाच दिलासा देण्यात आला. पण कविराजही असे बहाद्दर की त्यांनी "स्वये श्रीरामप्रभू ऐकती " हे अतिशय प्रसन्न गीत एका बैठकीत आणि तेही एकटाकी मुळीच खाडाखोड न करता लिहून खाली ग. दि. माडगूळकर अशी लफ्फेदार सही करून लाडांच्या पुढ्यात टाकून त्यांची चिंता दूर केली आणि बाबूजींनी तेथल्यातेथे त्या काव्यावर संगीतसाज चढवून स्वरबद्ध करून तितक्याच बहारदार पद्धतीने सादर केले. धन्य ते





कविराज आणि धन्य ते संगीतकार. गीतरामायणातील "पराधीन आहे जगती" या गाण्याविषयी प्रथम तयार केलेली चाल आयत्या वेळी बदलून ते गाणे म्हटल्याचा स्वतः बाबूजींनीच एका ठिकाणी उल्लेख केलेला आढळतो.

अशाच एका प्रसंगाविषयी संगीतदिग्दर्शक कोशल इनामदार यांनी सांगितलेला किस्सा नमूद करण्यासारखा आहे. बाबूजी आणि गदिमा या दोन दिग्गजांनी अनेक चित्रपटांसाठी काम केले. "गीतरामायण" सारखी युगपरिवर्तनीय निर्मिती त्यांनी केली परंतु त्यांच्या राजकीय मतप्रणाली अगदी दोन विरुद्ध टोकाच्या! बाबूजी हाडाचे संघस्वयंसेवक तर गदिमा स्वातंत्र्यलढ्यापासून कॉंग्रेसचे पक्के पाईक. या दोन दिग्गजांना घेऊन चित्रपटक्षेत्रातील आणखी एक दिग्गज राजा परांजपे "लाखाची गोष्ट" या चित्रपटाची निर्मिती करत होते त्यावेळची गोष्ट. सहज सुरू केलेल्या संभाषणाची गाडी कशावरून तरी राजकारणाकडे वळली आणि अगदी तिखट चर्चेत त्याचे रूपांतर होऊ लागले. शेवटी राजाभाऊंनी "तुमच्या राजकारणात माझ्या पिक्चरचा जीव चाललाय " असा बाण सोडल्यावर एकदम गदिमांनी "असे का?" म्हणत पेन उचलले आणि विचारले "सांगा बर गीताची पार्श्वभूमी काय ते?" आणि राजाभाऊंनी गाण्याची भूमिका वर्णन करून सांगितल्यावर दहा मिनिटात गाणे तयार करून गदिमा कागद राजाभाऊंच्या पुढ्यात सरकवत म्हणाले. "हे घ्या गाणं चाललो मी " असे म्हणून ते उठले व तरातरा निघाले. अजून ते बाबूजींच्याबरोबर झालेला वाद विसरले नव्हते . ते दारापर्यंत पोचतात तोच त्यांच्या कानावर बाबूजींची हाक आली, "अहो अण्णा, निघण्यापूर्वी





गाण्याची चाल ऐकून जाणार नाही का? " आणि लगेच त्यांनी ते गाणे त्यांना ऐकवलेही. ते गाणं होतं "डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे "

बाबूजींच्या संगीत कारकीर्दीचा विचार करताना त्यांच्या इतकेच हिंदी चित्रपटसृष्टीत संगीत दिग्दर्शनात अतिशय मोठे कर्तृत्व गाजवणाऱ्या एका. व्यक्तिमत्वाची आठवण झाल्याशिवाय रहात नाी

ते व्यक्तिमत्व म्हणजे सचिनदेव बर्मन . "दादा" सचिनदा आणि सुधीर फडके अर्थात बाबूजी यांच्यातील तीन महत्वाची साम्यस्थळे लक्षात घेण्यासारखी आहेत. त्यातील पहिले म्हणजे दोघांनाही सर्वमान्यता मिळाली ती प्रथम उत्कृष्ट गायक म्हणून व त्यानंतर संगीत दिग्दर्शनाकडे ते वळले. सुधीर फडके यांनी गायलेल्या गाण्यांची संख्या सचिनदांच्या गाण्यांपेक्षा खूपच अधिक आहे तरीही सचिनदा यांच्या आपल्याला माहीत असलेल्या गाण्यांची संख्या फार नसली तरी त्यांच्याविषयी अगदी किशोरकुमार आणि लताजींनीही "गीताची चाल जशी सचिनदा म्हणून दाखवत तसे व त्यांच्यासारखे गाणे आपल्याला जमत नाही " अशी कबुली दिली होती तर बाबूजीच्या विषयी सुद्धा तसेच म्हणता आले असते यात मुळीच संशय नाही.

अतिशय आदरणीय व्यक्ती म्हणून त्यांच्या क्षेत्रात त्यांचा मान राखला गेला. आपल्या शालीन वर्तनाने त्यांनी आपल्याविषयीचा इतरांचा आदर दिवसेंदिवस वृद्धिंगत केला. दोघांचीही संगीतकारकीर्द अगदी दीर्घ म्हणावी अशीच होती आणि आयुष्याचा अखेरचा श्वास घेईपर्यंत उत्कृष्ट संगीत देण्याचा आपला वसा त्यां दोघांनी कायम राखला. काळानुसार आपले संगीत अगदी





नवनूतन राहील अशी दक्षता त्या दोघांनीही घेतली आणि त्यामुळे त्यांचा जमाना संपला असे उद्गार काही इतर संगीतकारांचे शेवटच्या काळातले संगीत ऐकल्यावर काढले गेले तसे त्यांच्या बाबतीत झाले नाही. उलट त्यांचे संगीत शेवटपर्यंत अधिकच समृद्ध आणि नावीन्यपूर्ण होत गेले.

दुसरे महत्त्वाचे साम्यस्थळ म्हणजे सचिनदा याच्या पत्नी मीरा व बाबूजीच्या पत्नी ललिता दोघीही उत्कृष्ट गायिका होत्या. पण त्याचबरोबर जरा खटकणारे साम्य म्हणजे दोघींनाही स्वत:च्या संगीतरचनेत फारच कमी स्थान त्या दोघांनीही दिले. ललिताबाईंनी लग्नापूर्वी व नंतरही काही दिवस त्या काळातील अनेक दिग्गज संगीतकारांकडे गाणी म्हटली होती. त्यात सचिनदा, सी रामचंद्र, गुलाम हैदर यांचा समावेश होतो परंतु बाबूजींच्या संगीतदिग्दर्शनाखाली "सुहासिनी "या चित्रपटात एक गीत तेही शास्त्रीय संगीतावर आधारित चीज या स्वरूपाचे व "गीतरामायण" आकाशवाणीवर सादर होताना त्यातील कौसल्येची गाणी येवढाच त्यांचा सहभाग दिसतो. सचिनदांच्या संगीतरचना करण्यात मीरादीनी त्यांना महत्वाचा हातभार लावला पण त्यांच्या दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेले गीत मात्र आढळत नाही. मात्र त्यांनी बंगालीमध्ये अनेक कविता लिहिल्या व त्यांच संगीत सचिनदांनी केले व त्या मीरादींनी गायल्याही.

या दोन संगीतदिग्दर्शकांच्या बाबतीत तिसरे महत्त्वाचे साम्यस्थळ म्हणजे दोघांच्याही पुत्रांनी आपल्या पित्याचा वारसा पुढे चालवला. राहुलदेव यांच्या



बाबतीत ही गोष्ट अधिकच ठळकपणे नमूद करण्यासारखी असली तरी श्रीधर फडके यांचेही संगीतक्षेत्रातील योगदान दुर्लक्षिण्यासारखे नाही.

सार्वजनिक जीवनात सचिनदा अगदी एकलकोंडे होते. अगदी चित्रपटकलावंतांच्या असोसिएशनची वर्गणी घ्यायला येणाऱ्या माणसाला सुद्धा भेटायचे त्यांच्या जिवावर यायचे त्यामुळे त्याला प्रत्यक्ष न भेटता वर्गणीची रक्कम ते आपल्या घराच्या वरच्या मजल्यावरून सरळ खाली फेकून देत. बाबूजीचा खाक्या मात्र अगदी याच्या उलट होता. म्हणजे सार्वजनिक क्षेत्रात स्वत:ला झोकून देण्याची त्यांची वृत्ती होती. त्यामुळेच आपल्या संगीत कारकीर्दीवर पाणी सोडून गोवा मुक्तीसंग्राम सारख्या चळवळीत त्यानी भाग घेतला. सावरकरांवर चित्रपट काढण्यासाठी जिवाचे रान केले व अखेरीस आपला बेत तडीस नेला.

# ५. साहित्यसम्राट

साहित्यसम्राट हा किताब नरसिंह चिंतामण तथा तात्यासाहेब केळकर यांच्याबाबतीत वापरला जात असे हे माझ्या पिढीतील म्हणजे आयुष्याचा अधिक भाग विसाव्या शतकात घालवलेल्या वाचकांना माहीत असणार. तात्यासाहेबांच्या चतुरस्र लेखनामुळॅ त्याना तो मिळाला होता. परंतू त्यात एक त्रुटी होती ती म्हणजे त्यांनी "काव्य" या क्षेत्रात मात्र जवळ जवळ काहीच साहित्यनिर्मिती केल्याचे ऐकिवात नाही. ( निदान मला तरी माहीत नाही. ) त्या दृष्टीने साहित्याच्या अगदी प्रत्येक क्षेत्रात भरीव आणि मोलाची कामगिरी बजावल्यामुळे कविवर्य कुसुमाग्रजांना हा सन्मान देणे खरोखरच सयुक्तिक ठरेल. तेही तात्यासाहेब म्हणूनच प्रसिद्ध !

एक डझनाहून अधिक(१८) काव्यसंग्रह, चौदा स्वतंत्र व सहा अनुवादित नाटके, चार कादंबऱ्या, पंधरा कथासंग्रह, सात स्फुटलेखसंग्रह, व अनेक संपादित ग्रंथ अशी साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. याशिवाय वृत्तपत्रक्षेत्रात लेखनास सुरवात करून काही वृत्तपत्रांचे संपादनही काही काळ





त्यानी केले होते. त्यांच्या शब्दाचे सामर्थ्य एवढे की त्यांया "गर्जा जयजयकार "या कवितेने स्वातंत्र्यापूर्वीच्या पिढीतील प्रत्येक मराठी माणसाला मंत्रमुग्ध केले होते. शाळेत जायला लागण्यापूर्वी प्रभातफेऱ्यातून हे गीत गायले गेलेले ऐकून त्यावेळीही मला बरेच मुखोद्गत झाले होते. आणि त्याच्या नटसम्राट नाटकाचे आव्हान हे प्रत्येक मराठी नटश्रेष्ठांना शिवधनुष्य पेलण्याइतके कठीण त्याचबरोबर हवेहवेसे वाटते, त्याचमुळे त्याच नाटकावरील चित्रपट आजच्या पिढीलाही आकर्षित करत आहे. तात्यासाहेबांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो तो तात्यासाहेबांच्या मराठीवरील प्रेमामुळेच आणि त्यांच्या मराठी साहित्यक्षेत्रातील भव्य दिव्य कामगिरीमुळेच.

साहित्यक्षेत्रातील जेवढे काही सन्मान आहेत ते सर्व तात्यासाहेबांच्या दारी चालून आले. त्यासाठी कुठल्याही प्रकारचा आटापिटा करावा लागला नाही. १९६० मध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अध्यक्शपदी त्यांची निवड करण्यात आली. त्याच वर्षी "मराठी माती" या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला. त्यानंतर दोनच वर्षानी (१९६२)त्यांच्या "स्वगत" काव्यसंग्रहाला व १९६४ मध्ये "हिमरेषा"काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शसनाचा पुरस्कार लाभला. १९६४ च्याच मडगाव येथे अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. अखिल भारतीय नाट्यपरिषदेचा "राम गणेश गडकरी" पुरस्कार त्यांना१९६५ मध्ये प्राप्त झाला सुरवातीच्या काळात आपल्यावर गडकऱ्यांची मोहिनी होती व त्यांची नाटके आपण अनेकवेळा वाचली होती व त्यातील संवाद मुखोद्गतही होते असे त्यांनी म्हटले





आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे कुसुमाग्रजांचे पहिले प्रेम अभिनयावर होते आणि आयुष्याची पहिली तीन वर्षे त्यांनी चित्रपटात काम करण्याच्या हेतूने वाया घालवली होती आणि त्या काळात "सती सुलोचना" या चित्रपटाची कथा त्यानी लिहिली होती व त्यात भूमिकाही केली होती. सुदैवाने तो चित्रपट डब्यात पडून राहिला व त्यांनी पत्रसृष्टीत प्रवेश केला.

त्यांच्या "ययाती आणि देवयानी" या नाटकास १९६७ या वर्षी तर"वीज म्हणाली धरतीला या नाटकास १९६७ मध्ये राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले. मराठी नाट्यसंमेलनाचे ते१९७० या वर्षी अध्यक्ष होते.. १९७१ मध्ये त्यांच्या "नटसम्राट"या नाटकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला. तर त्याच नाटकासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांना १९७४ मध्ये मिळाला. पुढेही त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले. वरील सर्व पुरस्कारांवर कळस चढवणारा साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान म्हणजे "ज्ञानपीठ पुरस्कार" त्यांना १९८७ मध्ये प्रदान करण्यात आला. भारत सरकारच्या "पद्मभूषण" पुरस्काराने त्याना १९९१ मध्ये भूषविण्यात आले तर अंतराळ वैज्ञानिकांनीही त्यांच्या साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील कामगिरीचा गौरव अंतराळातील एका ताऱ्यास "कुसुमाग्रज" हे नाव देऊन केला.

तात्यासाहे बांचे सामाजिक क्षेत्रातील योगदानही तेवढेच महत्त्वाचे आहें. नाशिक शहराचा सांस्कृतिक आधारवड असेच त्यांचे स्थान शेवटपर्यंत राहिले आणि त्याचमुळे नाशिकमधील सर्व सांस्कृतिक चळवळींचे ते स्फूर्तिस्थान आणि प्रत्यक्ष कृतीशील व्यक्तिमत्व होते. "लोकहितवादी मंडळ" हे त्यांच्या





प्रयत्नास आलेले भरघोस फळ. त्यांनी नाशिकमधील सार्वजनिक वाचनालयातही लक्ष घातले व वाचनालयासाठी प्रशस्त इमारत निर्माण करण्यात यश मिळवले या इमारतीत एक आधुनिक नाट्यगृहही सामावण्यात आले आहे.

खाजगी आयुष्यात मात्र ते संकोची व प्रसिद्धिविन्मुख होते त्यामुळे २७ फेब्रुवारी या आपल्या जन्मदिनी अभिनंदनाचा वर्षाव टाळण्यासाठी ते अज्ञात स्थळी रवाना होत. बाह्य जगापासून आपला अलिप्तपणा कटाक्षाने जपण्याचा थोर कलावंताचा गुण त्यांच्यात पुरेपूर होता. त्यांच्याकडे आलेल्या एका गृहस्थास त्यंच्या पत्नी प्रभावतीबाई गेल्या हे माहीत नव्हते आणि तरीही त्तात्यानी चहा पोहे देऊन त्यांचे स्वागत केले. त्यानंतर त्या गृहस्थानी काकूंना भेटण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हां "त्या जाऊन महिना झाला" असे अगदी सहज तात्यानी सांगितले,"आणि मग चहा आणि पोहे ?" "ते मीच केले होते असे तात्यानी सांगितल्यावर त्या गृहस्थाला अगदी लाजल्यासारखे झाले. अश्या संकोची स्वभावाच्या माणसाचा सामाजिक कार्यात झोकून देण्याचा गुण हा त्यांच्या वृत्तीतील विरोधाभास असेच म्हणावे लागेल. दिवसभर तात्या आपल्या आवडत्या खुर्चीवर सिगरेट शिलगावून बसले आहेत व माणसे येत आहेत, त्यातील कोणी त्यांच्या कवितेचा-नाटकाचा भक्त असेल तर कोणी आपले लेखन दाखवून मार्गदर्शनाची अपेक्षा करतो आहे. कोणी तात्यांनी प्रेरणा दिलेल्या सांस्कृतिक कार्यात सामील होण्याचे बोलून दाखवत आहे तर कोणी आपली व्यथा तात्यांना सांगून ती हलकी करण्यासाठी आलेला आहे. तात्या



सगळ्यांना शांतपणे प्रतिसाद देत आहेत. असे दृश्य दिवसभर असे. तात्या आपला बहुमोल वेळ असा वाया घालवत आहेत असे त्यांच्या साहित्यिक मित्रांना वाटत असे. तरीही त्यांचे लेखनाकडे तितकेच लक्ष होते नाहीतर इतका प्रचंड व गुणसंपन्न साहित्यप्रपंच त्यांच्या हातून घडलाच नसता. त्यानुळे त्या मित्रांनी"तात्या लिहीत बसले आहेत हे आम्ही कधी पाहिले नाही. ते लिहितात हे कुणाला कधी कळले नाही, पण ते लिहितात हे तर नक्कीच "असे उद्गार काढले आहेत.





# ६. गीतारहस्य

"श्रीमद्भगवद्गीतारहस्य " हा ग्रंथ बऱ्याच जणांनी वाचला असेल किंवा माझ्याप्रमाणेच वाचू या सावकाश म्हणून अजून वाचला नसेल. मी मात्र बऱ्याच काळानंतर वाचला व बरेचदा वाचला. तो वाचावा असे इच्छिणाऱ्यांसाठी हा थोडा ग्रंथपरिचय !

श्रीमद्भगवद्गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र म्हटले की लोकमान्य टिळक किंवा लोकमान्य टिळक म्हटले की गीतारहस्य याच ग्रन्थाची आठवण होते इतका हा ग्रन्थ लोकमान्य टिळकांच्या जीवनाशी जोडला गेलेला आहे. खरे तर टिळकांच्या आयुष्याचे सारच त्या ग्रन्थात आहे म्हटले तरी चालेल. असा ग्रन्थ लिहिण्याची कल्पना अनेक वर्षे त्यांच्या डोक्यात घोळत होती. वयाच्या सोळाव्या वर्षी वडिलांच्या अंतीम आजारात त्यानी भगवद्गीतेवरील भाषाविवृत्ती हा प्राकृत टीकाग्रन्थ वाचल्यानन्तर आणि गीतेवरील अनेक संस्कृत व प्राकृत भाष्यांचा पुढील वयात अभ्यास केल्यावर त्या सर्वांमधील महत्त्वाची त्रुटी त्याना जाणवली ती म्हणजे सर्व ग्रन्थांनी दिलेला ब्रह्मज्ञान व





मोक्षमार्गावर दिलेला भर. अर्जुनाची मूळ शंका ही युद्ध करून स्वजन, गुरुजन व मित्रगण या सर्वांचा वध करण्याचे पाप का करायचे ,त्यापेक्षा अगदी संन्यास घेऊन भिक्षा मागणे बरे नव्हे का इतका उद्वेग त्याला आलेला असताना पुन्हा त्याला संन्यास, ब्रह्मज्ञान व मोक्षमार्गाचा उपदेश करून युद्धाला प्रवृत्त करणे कसे काय शक्य आहे या लोकमान्यांच्या शंकेला उत्तर या संस्कृत व प्राकृत टीका ग्रन्थात मिळत नसल्याने स्वतंत्रपणे त्याचा विचार करण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला त्यातून त्याना सापडलेल्या उत्तराचाच हा प्रकट आविष्कार असे म्हणता येईल.

ग्रन्थातील प्रस्तावनेत उल्लेखल्याप्रमाणे त्यांच्या या विचारांचे जाहीर प्रकटीकरण त्यांनी १९०२ ते १९०४ या काळात काही ठिकाणी व्याख्याने देऊन केले व त्यानी हा ग्रन्थ लिहावा असे त्यांचे मित्र दाजीसाहेब खरे व दादासाहेब खापर्डे यांनी आग्रह केला व तसे जाहीरही केले पण तसा निवान्तपणा त्याना मिळाला तो त्याना १९०८ ते १९१४ हा तुरुंगवास मंदले ( आपण मंडाले असा उच्चार करतो पण गीतारहस्य प्रस्तावनेत असा उल्लेख आढळतो ) येथे भोगावा लागला त्या काळात मिळाला.

त्यातही पहिली दोन वर्षे त्यांना वाचन व लेखनाची परवानगी नसल्यामुळे ऑक्टोबर १९१० ते मार्च १९११ या फक्त पाच महिन्यात त्यांनी या ग्रन्थाचा कच्चा खर्डा आणि तोही शिसपेन्सिलीच्या सहाय्याने लिहून काढला. फक्त पाच महिन्याच्या काळात अनेक संस्कृत, मराठी व इंग्रजी ग्रन्थांचे सम्दर्भ देऊन असा विद्वत्तापूर्ण ग्रन्थ लिहिणे आणि तेही मंदले सारख्या ठिकाणच्या तुरुंगवासात





(कारण मंदले म्हणजे दुसरे अन्दमानच )हे किती कठिण काम आहे . हे सुभाषचंद्र बोस यांनी केलेल्या वर्णनातून जाणवते . सुभाषचन्द्र बोस यांना या तुरुंगात रहावे लागले त्यावेळी त्यांनी त्याचे केलेले वर्णन असे आहे. आणि अश्या ठिकाणी राहून ळोकमान्यांनी असा महान ग्रंथ लिहावा याची त्यानी विशेष प्रशंसाही केली आहे. ते म्हणतात,

"मन्दले म्हणजे धुळीचे मूर्तिमंत साम्राज्य-इतर कोणाला तिथे थाराच नाही. ती तुम्हाला श्वासात भरून घ्यावी लागते. ती तुमच्या अन्नात असते त्यामुळे तुम्हाला खावीच लागते, ती तुमच्या टेबलावर असते, खुर्चीवर असते, अन्थरुणावर असते. इथले हवामान शक्तिक्षय करणारे आहे, बहुतेकांना सन्धिवात झालेला असतो. "लोकमान्यांना ठेवण्यात आलेली कोठडी सुभाषचंद्रांनी पाहिली व तिचे वर्णन असे केले आहे,

" लोकमान्यांना ज्या कोठडीत ठेवण्यात आले होते ती कोठडी अजूनही तशीच आहे तिच्यात थोड्याश्या सुधारणा करण्यात आल्या आहेत, आकारही वाढलेला आहे. आमच्या कोठडीप्रमाणेच तीही लाकडीच आहे त्यामुळे उन्हाळ्यात उकाडा आणि उन्हाची तिरीप सहन करावी लागते. पावसाळ्यात पाऊस आत येतो व हिंवाळ्यात बाहेरचा गारठा आत घुसतो. येथे नेहमीच धुळीची वादळे होत असतात. त्यावेळी सारा तुरुंग धुळीने माखला जातो. "

" लोकमान्य येथे सहा वर्षे होते हे सगळ्यांनाच ठाउक आहे. परंतु येथे त्यांना केवढ्या शारीरिक आणि मानसिक यातना सहन कराव्या लागल्या;याची फारच थोड्यांना कल्पना असेल. येथे त्यांना एकाकी अवस्थेत, एक नव्हे, दोन





नव्हे सहा वर्षे रहावे लागले ज्याच्याशी चर्चा करावी असा एकही सहकारी जवळ नव्हता. लोकमान्यांना इतर कैद्यांपासून दूर ठेवले जाई. पुस्तके हाच त्यांचा एकमेव विरंगुळा होता "

"लोकमान्यांच्या शारीरिक यातनांबद्दल जितके कमी लिहावे तितके बरे. त्यांना भारतीय दंडसंहितेखाली शिक्षा झालेली असल्यामुळे आजच्या राजबंद्यांपेक्षा त्यांची अवस्था अधिकच बिकट असली पाहिजे. त्यातून त्यांना मधुमेह होता. मन्दलेमध्ये सध्या जे हवामान आहे तेच लोकमान्य येथे असतांना असले पाहिजे आणि आज जर पंचविशी-तिशीतील तरुण माणसे इथल्या हवामानाबद्दल तक्रार करत असतील, त्यांना अपचनाचे आणि सन्धिवाताचे विकार जडत असतील, हळूहळू आपला शक्तिक्षय होत आहे असे जाणवत असेल तर पन्नाशी पार केलेल्या लोकमान्यांना येथे रहाणे किती कष्टप्रद आणि यातनामय ठरले असेल?"

" या कारागृहाच्या आवारात लोकमान्यांनी जे मूकपणे सोसले त्यासंबंधी फारसे बाहेर काही माहीतच नाही. कैद्याला प्रसंगाप्रसंगाने किती विवंचना छळतात आणि कधीकधी त्या किती असह्य होतात, याची कितीजणांना कल्पना असते?गीतेची शिकवण लोकमान्यांच्या मनोमानसी मुरलेली असल्यामुळेच त्यांनी या यातनांची आणि वेदनांची फिकीर केली नसावी त्यासंबंधी त्यांनी कधीही, कोणापाशीही तक्रारीचा शब्द उच्चारला नाही. "

"लोकमान्यांच्या 'गीतारहस्या ' सारखा व्यासंगपूर्ण आणि विचारभव्य ग्रंथ तुरुंगाच्या प्रतिकूल आणि निरुत्साही वातावरणात लिहिताना बौद्धिक



सामर्थ्याबरोबर अदम्य इच्छाशक्तीची किती गरज असते, याची कल्पना ज्याने तुरुंगात काही काळ काढलेला आहे त्यालाच येऊ शकेल. माझ्यापुरते सांगायचे तर या गोष्टीचा मी जेव्हां अधिक विचार करू लागतो, तेव्हां लोकमान्यांसंबंधी अधिकच आदर आणि भक्तिभाव वाटू लागतो. लोकमान्यांच्या महनीयतेचे मूल्यमापन करताना आपले देशबांधव या सर्व गोष्टी विचारात घेतील अशी मी आशा करतो. लोकमान्य मधुमेहाचे रुग्ण होते, उतारवयात त्यांना सहा वर्षे दूरवरच्या तुरुंगात एकाकी अवस्थेत काढावी लागली;आणि तरीही त्यांचे बौद्धिक सामर्थ्य आणि लढाऊ वृत्ती किंचितही कमी झाली नाही. त्या तश्या अंधाऱ्या कालखंडात त्यानी ' गीतारहस्या ' च्या रूपाने आपल्या मातृभूमीच्याचरणी अमोल नजराणा ठेवला. "

सुभाषचन्द्रांना मन्दलेच्या हवेत ते क्षीण होऊन ते जगतील की नाही या शंकेमुळे ब्रिटिश सरकारला नाइलाजाने दोन वर्षे सहा महिने आणि एकवीस दिवसांनी तेथून हलवावे लागले अश्या ठिकाणी सहा वर्षे तक्रार न करता राहून "गीतारहस्य" लेखनासारखे अभूतपूर्व ग्रन्थनिर्मितीचे कार्य लोकमान्यांच्या हातून घडावे हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. यामागे त्याना आपल्या देशवासियांना जागृत करण्याची जी तळमळ लागलेली होती तीच कारणीभूत होती, कारण निवृत्तिपर संदेश घेऊन संन्यस्त होऊन हा देश स्वातंत्र्यमिळवू शकणार नाही. पण अश्या वेळी फळाची आशा न करता कर्मयोगाचे आचरण करणे महत्त्वाचे होते आणि त्यासाठी हतबुद्ध झालेल्या देशबांधवांना "उत्तिष्ठ जाग्रत " म्हणून कार्यप्रवण करणे आवश्यक होते आणि म्हणूनच इतक्या



प्रतिकूल परिस्थितीत लोकमान्यांनी हा ग्रन्थ लिहिला. आणि त्यात प्रत्येक पानावर "कर्मयोग हाच गीतेचा सन्देश आहे" असा त्यांनी जणु पुकाराच केला.

लोकमान्यांनी ग्रन्थलेखन २ नोव्हेंबर १९१० ते ३० मार्च १९११ फक्त ५ महिने एवढ्या कमी अवधीत केले . त्यासाठी त्यांनी एकूण ३५० ते ४०० पुस्तके संदर्भग्रन्थ म्हूूून वापरली लेखनासाठी त्यांना सुरवातीस एकावेळी चारच पुस्तके जवळ ठेवण्याची परवानगी होती. लेखनासाठी कागद वह्यांच्या स्वरूपात व पाने मोजून देण्यात येत (कारण त्या कागदांचा काही क्रान्तिकारी लेखन करायला त्यांनी उपयोग केला तर?) लिहिण्यासाठी टोक काढलेल्या पेन्सिलीच मिळत ( हो त्या चाकूने जर काही क्रान्तिकारी प्रकार झाला तर?) या पेन्सिलींनी चार वह्यांमध्ये लेखन केले व एकूण मजकूर छापील ८३६ पानांचात्यासाठी त्यांनी वह्यांची जवळ जवळ त्याच्या दुप्पट संख्येने पाने वापरली व प्रत्येक भाग कोणत्या वहीच्या कोणत्या पृष्ठक्रमांकावर व कोणत्या कालखंडात लिहिला याची नोंद, समर्पण अनुक्रमणिका व प्रस्तावना शिवाय पुस्तकातील कोठला भाग कोणत्या भागापुढे जोडावयाचा याविषयी सूचनाही त्या वह्यांमधून होत्या. थोडक्यात आपण तुरुंगातून जिवंत बाहेर पडू की नाही असे त्यांना वाटत होते आणि तुरुंगातील सुभाषबाबूंनी वर्णन केलेल्या परिस्थितीवरून ते केवळ आत्मिक बळावर, योग्य वयात प्रकृती सुदृढ करण्यासाठी केलेल्या व्यायामामुळेच तुरुंगातून बाहेर पडू शकले व पुढे बिदान सहा वर्षे तरी जगू शकले असे म्हणावे लागेल.



हा ग्रन्थ वाचण्यापूर्वी कोणाचीही अशी कल्पना होईल की ज्ञानेश्वरी किंवा "भगवद्गीता जशी आहे तशी (Shrimad Bgavadgita as it is) या भक्तिवेदान्तयांच्या किंवा विनोबाजी किंवा इतर भाष्यकारांच्या ग्रंथांप्रमाणे एक एक अध्याय घेऊन त्यावर टीका या पद्धतीने ग्रंथ लिहिला असेल निदान मला तरी तसे वाटत होते प्रत्यक्षात ग्रन्थ दोन भागात विभागलेला आहे. पहिल्या भागात १५ प्रकरणे आहेत व दुसऱ्या भागात प्रत्येक अध्यायातील प्रत्येक श्लोकाचे भाषांतर देऊन पूर्वापार संदर्भ लक्षात येण्यास, ()टिळकांच्या मते इतर ग्रंथकारांनी अर्थ लावताना कशी ओढाताण केली आहे हे दाखवण्यासाठी स्पष्टीकरणात्मक टीपा दिल्या आहेत त्यामुळे हा भाग २६१ पृष्ठांचा झाला आहे तर पहिला भाग ५३२ पृष्ठांचा आहे. याशिवाय उल्लेखसूचीप्रमाणे गीतेतील श्लोकांचीही वेगळी सूची जोडल्यामुळे एकाद्या श्लोकाचा संदर्भ शोधण्यासाठी अतिशय सुलभ झाले आहे. वाचकाच्या अडचणींचा विचार करूनच जणु टिळकांनी हा ग्रन्थ लिहिला आहे.

" गीतारहस्य " किंवा "कर्मयोगशास्त्र "याप्रमाणे भगवद्गीतेवरील टीकाग्रन्थ नसून तो गीतेतील तत्वज्ञानाचा टिळकांच्या तर्ककठोर पद्धतीनुसार स्वतंत्र अर्थ लावणारा स्वतंत्र ग्रंथच आहे.

विषयप्रवेश या पहिल्या प्रकरणात त्यांनी श्रीमद्भगवद्गीता हा उपनिषदे व वेदान्तसूत्रे यातील धार्मिक तत्त्वज्ञानाची पूर्ती करणारा कसा हे दाखवले आहे.. त्यामुळेच उपनिषदे, वेदान्तसूत्रे व श्रीमद्भगवद्गीता या तिन्हींना मिळून प्रस्थानत्रयी असे संबोधण्यात येते. या ग्रन्थाच्या लोकप्रियतेमुळे त्यातील



तत्त्वज्ञानाचेच अनुकरण करणारे अनुगीता, अष्टावक्रगीता, पांडवगीता, गणेश गीता, राम गीता असे ३०-३५ गीता याच उपपदाचे ग्रन्थ निर्माण झाले व त्यातील श्रीमद्भगवद्गीता अथवा हरिगीता हाच आद्य व सर्वश्रेष्ठ कसा आहे हे त्यांनी दाखवले आहे. या अश्या महान ग्रन्थावर शंकराचार्यांपासून अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत अश्या अनेक सम्प्रदायाच्या आचार्यांनी केलेल्या भाष्यांचा समाचार घेऊन या सर्व भाष्यातून गीतेचा मुख्य रोख कर्मयोगावर आहे हा मूळ सिद्धान्तच कसा दुर्लक्षित झाला आहे हे दाखवून तो सिद्धान्त प्रस्थापित करण्यासाठीच या ग्रन्थाचे प्रयोजन आहे हे त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे.

कर्मजिज्ञासा या दुसऱ्या प्रकरणात अर्जुनावर जो प्रसंग आला तो काही अपूर्व नव्हता अश्याच प्रकारचे प्रसंग शेक्सपियरच्या हॅम्लेट किंवा करॉयलेनस या नायकांवरही आले होते आणि सर्वसामान्य माणसावरही येतात असे सांगून अश्या प्रसंगात कसे वागावे व त्यावर शास्त्रानुसार मार्ग कसा काढायचा हा पेच कसा पडतो याचे दिग्दर्शन करण्यात आले आहे व अहिंसा, सत्य, अस्तेय या सर्व गुणांचा कमी किंवा अधिक प्रमाणात वापर करणे याविषयी सामान्य माणसाचा कसा गोंधळ उडतो हे दाखवले आहे. यात धर्माने "नरो व कुंजरो वा " असा उद्गार काढणे किंवा "गांडीव धनुष्य दुसऱ्याला देऊन टाक "या धर्मराजाच्या उद्गारावर अर्जुनाने आपल्या प्रतिज्ञेनुसार त्याचा वध करायला निघाल्यावर त्यावर कृष्णाने सुचवलेला उपाय इ. गोष्टींचा उल्लेख करून अश्या प्रसंगात कसे वागावे याचा विवेक करणे कसे दुरापास्त आहे हे दाखवले आहे. "महाजनो येन गतो स पन्थ :" असे म्हटले तरी महाजनांनीच वेगवेगळया वेळी





वेगवेगळे आचरण केलेले आढळते त्यामुळे हा उपदेशही आचरणात आणायला कोणता सारासार विचार करणे आवश्यक आहे हे समजत नाही असे प्रतिपादन केले आहे. त्यामुळे अर्जुनाची शंका निराधार नसून मोठमोठ्या पंडितांनाही "काय करावे व काय न करावे " असा व्यामोह पडतो. असे टिळकांनी दाखवले आहे आणि सामान्य माणसाची हीच अडचण असते.

कर्मयोगशास्त्र या तिसऱ्या प्रकरणात कर्माकर्माच्या विवंचनेत अनेक अडचणी उद्भवतात म्हणून कर्म सोडून देणे युक्त नसून जेणेकरून जगातील कर्मांचा लोप ब होता त्यांचे पाप किंवा बंधन मात्र आपणास लागणार नाही अश्या प्रकारचा ’योग’म्हणजे युक्ति शहाण्या पुरुषाने स्वीकारली पाहिजे हे श्रीकृष्णाचे सांगणे आहे असे प्रतिपादन करून प्रथम "कर्म" या शब्दाचा विचार या प्रकरणात केला आहे व कर्माचे नित्य म्हणजे दररोज करावयाचे व नैमित्तिक म्हणजे कारणपरत्वे करावयाचे काम्य म्हणजे काही इष्ट हेतू साध्य करण्यासाठी करावयाचे, निषिद्ध म्हणजे सुरापानासारखे त्याज्य असे प्रकार सांगून श्रौत म्हणजे श्रुतीने सांगितलेले व स्मार्त म्हणजे स्मृतीने सांगितलेले इतकाच संकुचित अर्थ न घेता कोणतीही कायिक अथवा वाचिक अगदी श्वसनासरखी प्रतिक्षिप्त क्रियाही "कर्म’ या शब्दात अंतर्भूत होते असे गीतेचे मत आहे.

याच प्रकरणात पुढे 'योग'या शब्दाचे विवरण ' कर्मसु कौशलम 'असे केले आहे व गीतेतील त्याचा अर्थ "कर्माचे ठायी स्वभावत: असणारे जे बंधकत्व ते नाहीसे करण्याची युक्ती आणि ती युक्ती म्हणजे"सिद्धि व असिद्धीविषयी समत्वबुद्धीने कर्म करणे म्हणजे अनासक्त वृत्तीने कर्म करणे होय. " हाच उपदेश



गीतेमध्ये आहे हे सांगण्याचे कारण म्हणजे शंकराचार्यांपासून अनेक संप्रदायांच्या प्रवर्तकानी कर्मसंन्यासावर भर देऊन गीतेतून तोच अर्थ काढण्याचा प्रयत्न केला आहे तो तसा नाही हे ठामपणे दाखवून देणे. कर्मसंन्यास या शब्दाचा सोयिस्कर अर्थ काढून काहीही कार्य न करता मी "सर्वसंगपरित्याग केला आहे" असा दावा मिरवण्याचा सर्वसामान्यास मोह होणे स्वाभाविकच असून प्रत्यक्षात फलासक्ति न ठेवता सतत कर्म करत रहाणे अश्या प्रकारे निस्पृह होऊन जो पुरुष व्यवहारात वागतो व ज्याला ममत्व व अहंकार नाही त्यालाच शान्ति मिळते.

पारतंत्र्यात असताना संन्यास व भक्ती अश्या निष्क्रियतेला उत्तेजन देणाऱ्या प्रवृत्तींना खतपाणी घालण्यासाठी श्रीमद्भगव्द्गीतेसारख्या ग्रंथाचे प्रयोजन नसून अखंड कर्म आणि तेही कोठलीही फलाशा न धरता करण्याचाच संदेश त्यातून श्रीकृष्णांनी दिला आहे हे ठासून सांगण्यासाठीच या ग्रंथबिर्मितीचा प्रचंड उद्योग लो. टिळकांनी केला होता, ग्रंथात एका ठिकाणी त्यांच्या उपहासात्मक शैलीत त्यानी म्हटले आहे,

"सांसारिक कर्मापासून निवृत्त होऊन भगवद्भजनी लाग किंवा संन्यास घे हेच जर गीतेचे तात्पर्य म्हणावयाचे, तर अर्जुन लढाईचे घोर कर्म सोडून भिक्षा मागण्यास आयताच तयार झाला असल्यामुळे त्याला हा उपदेश करण्याची जरूर नव्हती. पहिल्याच अध्यायाचे अखेरीस "वा:! काय उत्तम गोष्ट बोललास! तुला झालेली उपरति पाहून मला आनंद वाटतो ! चल;आपण दोघेही हा कर्ममय संसार सोडून संन्यासाश्रमाने किंवा भक्तीने आपल्या आत्म्याचे कल्याण करून घेऊ!" अश्या अर्थाचा एकाददुसरा श्लोक श्रीकृष्णाचे तोंडात घालून तेथेच





गीतेची समाप्ति करावयास पाहिजे होती, मग इकडे लढाई होऊन व्यासांनी तिचे वर्णन करण्यात तीन वर्षे (महाभारत आ. ६२. ५२) आपल्या वाणीचा दुरुपयोग केला असता, तर निदान अर्जुन आणि श्रीकृष्ण यांस तरी त्याचा दोष लागला नसता "आणि त्याचमुळे ग्रन्थाच्या "गीताध्यायसंगती या १४ व्या प्रकरणात त्यांनी अगदी परखड भाषेत आपले मत मांडताना म्हटले आहे,

"गीता म्हणजे कर्म, भक्ती व ज्ञान या तीन स्वतंत्र निष्ठांची खिचडी, किंवा कापूस, रेशीम व जर यांच्या चिंध्या शिवून तयार केलेली गोधडी नसून कापूस रेशीम व जर यांचे निरनिराळे धागे यथास्थानी योग्य रीतीने बसवून दिल्यावर कर्मयोग नावाचे मौल्यवान व मनोहर असे हे गीतारूपी सणंग अव्वलपासून अखेरपर्यंत अत्यंत योगयुक्त चित्ताने सलग विणले आहे.

त्यामुळेच या ग्रंथास त्यांनी गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र " असे नाव दिले आहे. व योग: कर्मसु कौशलम्‌ या गीतेतीलच सूत्रानुसार कर्मातील कुशलता म्हणजेच योग आणि योगशास्त्र म्हणजे कर्मयोगशास्त्र अशी उपपत्ती देऊन गीतेतील प्रत्येक अध्यायाच्या अखेरीस "श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे " या प्रत्येक शब्दाची फोड करताना हे योगशास्त्र म्हणजे कर्मयोगशास्त्रच अहे हे ते पुना पुन्हा बजावतात.





# ७. बाराच्या भावात ---

(“चीपर बाय द डझन” या पुस्तकाचा परिचयात्मक लेख)

"इतक्या मुलांच्या ताफ्याला कसा काय बुवा पोसतोस? " गमतीने फ्रॅंकला आपल्या डझनभर मुलांबरोबर पाहून कुणी विचारलं तर तो तेवढ्याच गमतीत उत्तर देई "डझनाच्या भावात ते स्वस्त पडतं ("Its always cheaper by the dozen")कुठलीही गोष्ट घाऊक प्रमाणात घेतली की स्वस्त पड़ते पण म्हणून मुलेही अशी डझनभर अगदी हौस म्हणून सुद्धा होऊ देणारी नवराबायकोची जोड़ी क्वचितच पहायला मिळते,आता ज्या काळातली (१८७१)ही गोष्ट आहे त्यावेळी भारतात सुद्धा अनेक जोडप्याना १२-१३ मुले असायचीही अगदी रवीन्द्रनाथ टागोरांनाही १२-१३ भावंडे होती तर सध्याही लालूजीना डझनाच्या जवळपास अपत्ये आहेतच की त्यामुळे डझनभर मुलांचे आईबाप असणे याचे भारतीयांना काही कौतुक वाटायला नको. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेतही बरीच मुले असणारे आईबाप नसतीलच असे नाही पण अगदी





ठरवून बारा मुलामुलींचे आईबाप होणे (त्यातही सहा मुलगे आणि सहा मुली असणे हा मात्र योगायोग) ही गोष्ट नवलकथा होण्याचे कारण त्या मुलांचा बाप फ्रैंक गिलब्रेथ आणि त्याची उच्चशिक्षित बायको लिलियन! "चीपर बाय द डझन " हे फ्रॅंक (ज्यूनियर ) व अन्र्स्टाइन या त्यांच्या दोन मुलांनी आपल्या या जगावेगळ्या कुटुंबाविषयी लिहिलेले पुस्तक. त्यावर काही चित्रपटही निघाले. व चांगलेच गाजलेही,

फ्रैंक गिलब्रेथ हा time and motion तज्ञ म्हणून प्रसिद्धहोता व अभियांत्रिकी अभ्यासक्रमात त्याचे काळ व वेळ विषयक नियम त्याच्या स्पेलिंगची अक्षरे Gilbreth उलट्या क्रमाने घेतल्यास होणाऱ्या Therbligsया शब्दाने ओळखले जातात. लहानपणीच वडील मरण पावल्यावर फ्रॅंकचे बालपण गरिबीतच गेले . तरी त्याला आईने प्रसिद्द M I T शिक्षणसंस्थेत शिकवण्याचे ठरवले पण आपल्या परिस्थितीचा विचार करून गवंडी कामकरणाऱ्या माणसाकडे तो कामाला राहिला, आईने त्याला एकच मन्त्र दिला होता तो म्हणजे " गवंडी झालास तरी सर्वोत्कृष्ट गवंडी हो" फ्रैंकने आपले काम करताना हां उपदेश पुरेपूर अमलात आणला व हजर होताच तेथील कामाची पद्धत पाहून त्याने नापसंती व्यक्त केली आणि मालकाला सुनावले "हे काम यापेक्षा कितीतरी कमी वेळेत करता येईल" पण मालकाला या पोराचा हा आगाऊपणा आवडला नाही, "उगीच मला शहाणपणा शिकवू नकोस " त्याने त्या पोरालाच सुनावले . पण पोरगा असं ऐकणाऱ्यातला नव्हता त्याने विटा रचून भिंत बांधण्यासाठी एक लाकड़ी ओटा तयार केला त्यामुळे भिंत बांधताना

जमिनीवरील विटा उचलण्यातील वेळ वाचू लागला व कामे कमी वेळात होऊ लागले हे पाहुन त्यालाही ही युक्ति पटली आणि फ्रैंकनेतर त्या ओट्याचे पेटेंटच घेतले आणि नंतर कामातील वेळ वाचवण्याच्या पद्धतीचा तज्ञ (Time and motion study expert) म्हणूनच तो ओळखला जाऊ लागला त्याला बायकोही उच्चशिक्षाविभूषित मिळाली आणि त्या दोघांनी संसार थाटला ते आपल्याला बारा मुले पाहिजेत असे ठरवूनच! कारण काय तर त्याची पद्धती संसारालाही कशी उपयुक्त आहे हे दाखवण्यासाठी! अर्थात त्या दोघानाही मुलांची हौस होती हे तर खरेच! पण या मुलांना व्यवस्थित वाढवण्यासाठी प्रत्येक मुलाला यंत्राच्या हालचालींचा असावा तसा एक तक्ता करून दिलेला असे व त्यात त्याने अथवा तिने उठल्यापासून अगदी दात घासण्यापासून आपल्या कार्यक्रमाची वेळेसकट कशी नोंद ठेवावी लागे ( यातून नुकतीच जन्मलेली व लिहायला न येणारी मुलेच फक्त सुटत )याचे वर्णन करून तो एक सैनिकी शिस्तीचाच ( regimentation ) प्रकार होता असा मिस्किल शेरा या शिस्तीचाच भाग बनलेल्या या लेखक्द्वयांनी मारला आहे पण एका मुलाचे पालकच आपल्या एकाच मुलाच्या दैनंदिन कार्यक्रमाने कसे टेकीला आलेले असतात, तर अश्या बारा मुलांच्या पालकांना असे सैनिकी शिस्तीचे पालन करणे आवश्यकच होते असे प्रतिपादनही केले आहे.

घरातील अनेक कामें करून घेण्यासाठी या मुलांनाच आपण किती पैश्यात हे काम करू शकू याचा अंदाज एका कागदावर एका बंद पाकिटात सादर करावा लागे व त्यातील कमीतकमी पैश्यात काम करणाऱ्या मुलाला अथवा मुलीला ते

काम देण्यात येई एकदा त्याच्या एका मुलीने कमित कमी पैश्यात घराच्या बाहेरील भिंतीला रंग देण्याचे काम पत्करले कारण त्यातून तिला रोलिंग स्केट्स घ्यायचे असतात. त्या मुलीच्या वयाच्या मानाने ते काम खूपच कष्टाचे होते त्यामुळे त्या ठराविक वेळेत ते काम करताना ती अगदी झीट येऊन पड़ते काय असे वाटून "काम राहु दे " असे सांगायचे तिच्या आईच्या मनात येते पण स्वत: गिलबर्थ मात्र "तिने ते तिच्या शब्दाला जागून पार पाडलेच पाहिजे असे म्हणतो व तिलाच काम करू देतो . तिची आई त्यावेळी त्याला "पाषाण हृदयी " म्हणते पण फ्रैंक मात्र शेवटपर्यंत आपला हेका सोडत नाही. शेवटी ती मुलगी काम संपवून अगदी जवळजवळ बेशुद्धच पड़ते पण दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर उश्याशी तिला हव्या असणाऱ्या स्केटसाची जोड़ी तिला मिळते तिची किंमत त्या कामाच्या बोलीच्या रकमपेक्षा कितीतरी जास्त असते. त्यावेळी फ्रैंक म्हणतो, "तिला कळायला हवय की तिचा डॅडी नुसताच शिस्तीचा भोक्ता नाही तर तिच्यावर प्रेमही तितकाच करतो"

वेळ वाचवण्याबाबतीत फ्रॅंक गिलब्रेथ किती दक्ष असतो याविषयी त्याच्या दोन मुलांनी लिहिलेल्या या कथेत दाढी करणे, स्नान करणे अश्या अगदी क्षुल्लक गोष्टींचाही त्यांचा डॅडी कसा विचार करतो याची मजेदार हकीकत येते. साधी शर्टाची बटणॅ लावण्याची क्रियाही त्याच्या सूक्ष्म दृष्टीतून सुटत नाही. खालून बटणे लावत वरपर्यंत गेल्यास तीन सेकंदात तर वरून खालती आल्यास सात सेकंदात ही क्रिया होते असे त्याचे निरीक्षण. दाढी करण्याचा वेळ वाचावा म्हणून दोन्ही हातानी दाढी करण्याचाही प्रयत्न तो करतो

पण त्यात वाचणारा वेळ नंतर होणाऱ्या जखमांची मलमपट्टी करायला लागणाऱ्या वेळेपेक्षा कमी असल्याने तो ती पद्धत वापरण्याचे रद्द करतो. शस्त्रक्रिया करताना योग्य ते हत्यार अचूकपणे देण्याचे काम परिचारिकेवर सोपवण्याची कल्पना त्याचीच व तीच शस्त्रवेद्य आजही वापरतात. त्याच्या स्वतःच्या एका मुलाची टॉन्सिल्सची शस्त्रक्रिया करताना शस्त्रवैद्याच्या हालचालींचे निरीक्षण करून तीच शस्त्रक्रिया कमी वेळात कशी करता येईल याविषयी सूचना तो शस्त्रवैद्याला देतो व आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी आपल्या सर्व मुलाच्या(काहीच्या बाबतीत आवश्यकता नसतानाही )टॉन्सिल्स्च्या शस्त्रक्रिया हा पठ्ठ्या स्वत: करतो.

याशिवाय कोठेही बाहेर मुलांना घेऊन गेल्यावर हॉटेलमध्ये किंवा इतरत्रही डझनाच्या भावात त्याना काही सवलत मिळते का याची चौकशी करणे ,सर्वांना एका मोटारीत कोम्बून भन्नाट गाडी चालवणे, शाळेतही प्रवेश घेताना व पुढेही वयाच्या मानाने शहाण्या आपल्या मुलांना वरच्या यत्तांमध्ये चढ़वणे असे अनेक विनोदी प्रकार फ्रैंक करी व त्याचे वर्णनही तितकेच चटकदारपणे पुस्तकात आले आहे. एक असाच विनोदी किस्सा लेखकद्वयांनी लिहिला आहे तो त्यांच्या शब्दातच असा आहे

" इतकी मुले असल्यामुळे डॅडचा त्याना ओळखण्यात कधीकधी गोंधळउडे असं काही लोकांच मत . डॅड स्वत:च याविषयी एक किस्सा सांगत. एकदा आई ला एका ठिकाणी व्याख्यान द्यायला जायचे होते म्हणून आमची

सेना त्यांच्या ताब्यात देऊन ती गेली. ती परत आल्यावर तिने विचारले, " सगळे काही सुरळीत झाले ना?पोरांनी काही गोंधळ केला नाही ना?"

"नाही नाही मुळीच नाही " डॅड म्हणाले आणि आमच्यापैकी एकाकडे बोट दाखवून पुढेम्हणाले, "त्या स्वारीन ज़रा त्रास देण्याचा प्रयत्न केला पण एक रट्टा दिल्यावर तोही झाला सरळ " यावर आईचा चेहरा पडला आणि ती म्हणाली, "अहो तो आपला नाही आपल्या शेजारयांचाआहे"आम्हाला तर हां प्रसंग आठवत नाही . पण डॅड ना असे विनोद करणे आवडत असे. एक गोष्ट मात्र खरी की आमच्या शेजारी दोन मुले आमच्यासारखी केसाचा लाल रंग असलेली होती. "

आपल्या मुलांचा अंघोळ घेतानाचा वेळही वाया जाऊ नये म्हणून जर्मन आणि फ्रेंच भाषेतील कॅसेटस तो बाथरूममध्ये लावून त्यांच्या कानावर त्या भाषा आपोआप पडतील असे तो करतो आणि आश्चर्य म्हणजे त्या ऐकून ती मुले खरोखरच त्या भाषा उत्कृष्ट बोलू लागली. तीच गोष्ट टंकलेखनाची व द्रुत आकडेमोडीची! त्याच्या विशिष्ट पद्धतीने गेल्यामुळे सर्व मुले या दोन्ही गोष्टी उत्तम प्रकारे करू लागली. आपल्या कल्पना अमलात आणण्याची प्रयोगशाळा म्हणूनच आपल्या डझन अपत्यांचा तो उपयोग करतो . त्याला मुलांची आवड तर होतीच आणि त्यात तो अतिशय रमतो पण तशीच बायकोही त्याला मिळते हे आश्चर्यच! अतिशय शांतपणे ती एवढा मोठा कुटुंबाचा व्याप संभाळते . तीही उच्चविद्याविभूषित स्त्री असते व नवऱ्याच्या प्रत्येक मोहिमेत तीही उत्साहाने हातभार लावते एवढेच नाही तर श्रीयुत गिल्ब्रेथ

त्यांच्या वयाच्या ५५व्या वर्षीच मरण पावल्यावर एवढ्या मोठ्या कुटुंबाची जबाबदारी तर ती संभाळतेच पण त्याच बरोबर त्याच्या मृत्यूनंतर तो ज्या विषयावर भाषण देण्यासाठी एका विद्वत्सभेत जाणार असतो तेच भाषण अगदी त्याच्याच तयारीने ती देते ही मोठ्या नवलाचीच गोष्ट. नवऱ्याच्या पश्चात मोठ्या हिमतीने ती त्याचा व्यवसाय सांभाळते आणि आपल्या अपत्यांना अगदी कुशलतेने कसे सांभाळते हा या कथेचा उत्तरार्ध "बेलेज ऑन देअर टोज " याच दोन मुलांनी लिहिला आहे "चीपर बाय द डझन " या कथेवरच तीन चित्रपट निघाले व सर्व तितकेच गाजले. त्याचा उत्तरार्धही चित्रपट स्वरूपात निघून गाजला आहे. या कथेलाएक कारुण्यपूर्ण किनार आहे ती म्हणजे या भावंडांपैकी एक मेरी ही तिच्या वयाच्या पाचव्या वर्षीच घटसर्पाने मरण पावली आहे पण "चीपर बाय द डझन" पुस्तकात व चित्रपटातही या गोष्टीचा उल्लेख नाही. तीन वेळा निघालेल्या चित्रपटापैकी एका चित्रपटात या गोष्टीचा उल्लेख आहे म्हणे! मात्र प्रत्यक्षात मेरीचे जाणे या कुटुंबाच्या मनास अतिशय लागून राहिले होते हे मात्र तितकेच खरे.

("चीपर बाय द डझन "या पुस्तकाचा मराठी अनुवाद मंगला निगुडकर यांनी अतिशय मनोरंजकपद्धतीने केला आहे व मेहता प्रकाशन ने तो प्रकाशित केला आहे. )



# ८. तेव्हां आणि आता

"बाबा, एका शब्दाचा अर्थ हवा आहे. " माझ्या मुलाचा अमेरिकेतून फोन होता. अर्थात शब्दाचा अर्थ विचारण्यासाठी त्याने फोन केला नव्हता पण फोन केल्यावर त्याला आठवल्यामुळे त्याने विचारले होते. "विचार की " मी म्हणालो अर्थात माझ्याही मराठीच्या ज्ञानावर माझ्या विस्मरणशक्तीने मात केली नसेल या आशेवर मी तसे म्हणू शकलो. " औट म्हणजे काय? " मुलाने विचारले. इतक्या साध्या शब्दावर तेसुद्धा अमेरिकेत सॉफ्ट वेअर इंजिनिअर म्हणून काम करणाऱ्याने औट व्हावे याचे मला आश्चर्य वाटले. "अरे औट म्हणजे बाद " शक्य तो स्वर फार चढू न देता मी उत्तर दिले कारण कदाचित त्याला मराठी प्रतिशब्द आठवत नसावा म्हणून व माझ्या नातवाला म्हणजे त्याच्या मुलाला मराठी शिकवताना त्याला तो हवा असेल असे मला वाटले. पण त्याने त्यावर "अहो बाबा, ते तर मला माहीतच आहे मला मराठी औट शब्द हवा आहे, म्हणजे सुमितला, त्याच्या मुलाला, त्याच्या मराठीच्या गृहपाठात विचारला आहे. " असे तो म्हणाल्यावर मात्र काही वेळ मीही डोके खाजवले, आणि





एकदम आठवले, आणि मी उत्तर दिले, "अरे, आठवले ,औटे म्हणजे साडेतीन, आमच्या लहानपणी आम्हाला पाढे पाठ करावे लागत त्यात औटकी पण असे. "कमाल आहे असले आडनीड पाढे कशाला शिकावे लागत?". त्याच्या लहानपणी तीसपर्यंतच पाढे पाठ करून दमलेल्या मुलाने विचारले.

"अरे इतकेच नाही तर पावकी, निमकी, पाउणकी, सवायकी, दिडकी, अडीचकी पण पाठ करावे कागत असे. त्यात आकड्यांचे १/४, १/२. ३/४, तसेच सव्वापट, दीडपट, अशा हिस्से व पटी पाठ कराव्या लागत. त्या काळात चलनात रुपया अधेली, पावली अशी नाणी व वजना मापात शेर, चिपटे मापटे, अडीश्री, पायली अशी वजने मापे असल्यामुळे तोंडी हिशोब करायला या पाठांतराचा उपयोग व्हायचा " मी उत्तरलो. पाढ्यांचे एवढे प्रकारच नाही तर पाठ्यपुस्तकातल्या सगळ्या कविता तोंडपाठ करण्यात मोठी बहादुरी वाटायची. त्याव्यतिरिक्त श्रीमद्भगवद्गीतेचे बरेच अध्याय निदान १२ वा आणि पंधरावा तरी आमचा पाठ असायचा आता हे पाठांतर करायला नातवंडाना सांगितले तर शाळेतच न जाण्याची धमकी ती देतील असे वाटते. मात्र दूरदर्शनवर क्रिकेटची मॅच पहायला लागताच कोणत्या फलंदाजाने कोणाला कितीवेळा बाद केले किंवा सचिनने कोणत्या सामन्यात किती धावा केल्या याविषयीची आकडेवारी त्यांच्या तोंडून फटाफट ऐकायला मिळते. त्याना ते पाठही करावे लागत नाही.

काही गोष्टी आपण कधीच वापरणार नाही असे तेव्हां मला उगीचच का वाटत असायचे कुणास ठाउक. उदाःफ्रीज आपण कधीच घेणार नाही . त्यात शक्यतेचा भाग अगदी नव्हता असे नाही पण शक्याता निर्माण झाल्यावरही



घ्यायचा नाही ही माझी पर्यावरणवादी भूमिका अगदी औरंगाबादला स्वत:चे घर बांधेपर्यंत बदलली नव्हती त्यामुळे फ्रीजसाठी स्वयंपाकघरात जागा सोडून वीज जोडणी घेण्याचाही मी विचार केला नव्हता. कमीतकमी पुढे मुले या जागेतच राहिली तर त्याना तरी फ्रीज घ्यावा असे वाटेल इतका सुद्धा दूरवरचा विचार मला करावा वाटला नाही. त्यावेळी नैसर्गिक तेच हितकारक उदा : डेऱ्यातले थंडपाणी, असे काहीतरी तत्त्व माझ्या डोक्यात बसले असावे. पुढे या तत्त्वाप्रमाणे वागण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात आल्यावर, अर्थात त्या माझ्या लक्षात आल्या असे म्हणण्यापेक्षा त्या सौ. ने लक्षात आणून दिल्यानंतर मला त्याच जागेत तीनदा फ्रीज घ्यावा लागला. पण इतके दिवस तिने माझ्या तत्त्वप्रणालीला विरोध कसा केला नाही समजत नाही.

टेलिफोनच्या बाबतीतही माझे मत बरेचसे असेच होते इतकेच काय बरेच लोक त्याबाबतीत माझ्याशी सहमत होते. माझा डॉक्टर भाऊ सुद्धा उगीच लोक केव्हांही फोन करून त्रास देतात असे मत व्यक्त करून टेलिफोन नाही तेच बरे असे म्हणायचा. अशी मनोवृत्ती होण्यामागे टेलिफोन खात्याचाही बराच मोठा हात होता. अर्थात हे खाते जनतेला कोणतीही गोष्ट सहजासहजी उपलब्ध होऊन देण्याच्या शासकीय धोरणाशी सुसंगत असेच वागत होते. त्यामुळे त्यावेळी टेलिफोन हे कार असण्याइतकेच श्रीमंतीचे लक्षण समजले जात होते. मुलगा अमेरिकेला गेला तरी माझ्याकडे टेलिफोन नव्हता. आता अमेरिकेला जाणारा माणूस तेथे जाईपर्यंत प्रवासास सुरवात करण्यापासून ते ज्या ठिकाणी प्रवासात विमान थांबत असेल त्या प्रत्येक ठिकाणी व नियत स्थानी पोचल्यावर आपल्या



घरातील लोकांशी संपर्क साधू शकतो पण तेच माझा मुलगा अमेरिकेस पोचला तरी माझ्याकडे फोन व त्याच्याकडे पुरेसा पैसा नसल्यामुळे दोन तीन दिवस तो माझ्याशी संपर्क साधू शकला नाही. त्याने निघताना त्याच्या तेथील ऑफिसचा क्रमांक दिला होता त्यावर एस. टी. डी. केंद्रावरून फोन लावण्याचा मी प्रयत्न केला आणि अर्धा मिनिट बोलून शेवटी त्याच्याशी संपर्क साधता आलाच नसला तरी त्या अर्ध्या मिनिटासाठी साठ सत्तर रुपये मोजून गप्प बसलो शेवटी निघाल्यानंतर तिसऱ्या दिवशी माझ्या भावाच्या घरी त्याचा फोन आला व तो सुखरूप पोचल्याचे कळून जीव भांड्यात पडला.

आता मात्र आठवड्यातून केव्हांही आम्ही दोघेही एकमेकांशी कितीही वेळा आणि कितीही वेळ बोलतो यात काही विशेष नाही. आमची मोलकरीणही आपण येत नाही हे फोन तोसुद्धा मोबाइल करून कळवते. उलट आता मोलकरणीकडे फोन असणेच अधिक आवश्यक झाले आहे. एके काळी मोबाइल फोन म्हणजे श्रीमंतीचे लक्षण समजले जात होते यावर कोण विश्वास ठेवील?आश्चर्य म्हणजे भारतापेक्षा अमेरिकेत मोबाइल वर बोलणे महाग आहे. शिवाय भारतात येणारे फोन विनाशुल्क होतात तर अमेरिकेत मात्र अजूनही येणारा कॉलसुद्धा सशुल्क असतो. काही प्रकारच्या फोनवरील संभाषण त्यामानाने स्वस्त असते व त्यावरून परदेशीही फोन करणे स्वस्त पडते हे तितकेच खरे पण आता भारतात फोन ही चैन राहिली नाही.

त्यावेळी रेडिओ ही चीज आमच्याकडेच काय पण आख्या गावात तरी कुणाकडे होती असे वाटत नाही. फारच संगीतप्रेमी व ऐपत असेल तर फोनोग्राफ



असायचा. बहुतेक आमच्या गावात असलेल्या तीन चार हॉटेलमध्ये मात्र हटकून असायचा त्याला सगळेच जण नुसतेच फोनो म्हणत.. माझ्या वडिलांचे एक मित्र तेही जरा परिस्थितीने बऱ्यापैकी त्यामुळे त्यांच्याकडेही फोनो होता. आम्ही रहात असलेल्या भाड्याच्याच घरासमोर एक दिलखुष होटेल होते तेथेही फोनो होता. त्यानंतर आम्ही घर बदलले या घराच्या समोरच शंकरराव नावाचा हरहुन्नरी माणूस रहात असे. कुठलीही वस्तु बिघडली की ती शंकररावाकडे दिली की ती दुरुस्त करण्याचे कौशल्य त्याच्याकडे होते. त्याच्याकडे असाच एक फोनो होता आणि तो अगदी दिवसभर त्यावर गाणी लावायचा. त्यात त्यावेळची "चारसौ बीस" "बरसात" नागिन""कठपुतळी" या सिनेमांची गाणी असत तर काही ठराविक मराठी गाणी पण असत. त्यामुळे त्यावेळी आपण मोठे झालो की असाच एक फोनो घ्यायचे आणि हव्या त्या रेकॉर्ड घेऊन मनसोक्त गाणी ऐकायचे माझे ध्येय निश्चित झाले होते.

त्यानंतर गावातील काही घरात रेडिओचा प्रवेश झाला, आणि माझे ध्येय जरा बदलले आणि आपण रेडिओ घेऊन रेडिओ सिलोन व विविध भारती ऐकत बसायचे याविषयी मी ठाम बनलो. त्यानंतर देशपांडे आणि मी संयुक्त रेडिओ औरंगाबादला नोकरीस लागल्यावर घेतला व दोघांच्या ओढाताणीत ( संदर्भ : माझा पहिला रेडिओ -- हास्यरंग) तोच रेडिओ पूर्णांशाने माझा झाल्यावर अगदी मोठे ध्येय साफल्य झाल्यासारखे वाटले. पण थोड्याच दिवसात तो रेडिओ लहान वाटून मी मर्फीचे मोठे धूड घरात आणले.



त्याच काळात हवे ते गाणे ऐकण्यासाठी रेकॉर्ड प्लेअर हवा म्हणून एच. एम. व्हीचाच कॅलिप्सो रेकॉर्ड प्लेअर घेतला व त्याच बरोबर बऱ्याच ७८, ४५ व ३० फेऱ्यांच्या ध्वनिमुद्रिका पण घेतल्या. त्याना त्यावेळी ७८ आर. पी. एम. एलपी व ई एलपी असेच म्हणत. त्यावेळी मोठ्या हौसेने पन्डित रविशंकर, रामनारायण, निखिल बॅनर्जी, डी. व्ही. पलुस्कर यांच्या ई एल पी, तसेच बऱ्याच भावगीतांच्या, नाट्यसंगीताच्याही ध्वनिमुद्रिका घेतल्या.

तेवढ्यात कॅसेटचा जमाना आला आणि रेकॉर्ड प्लेअर काढणे, तो रेडिओला जोडणे, हवी ती रेकॉर्ड शोधून लावणे आणि ती संपल्यावर बदलणे इ. गोष्टींचा कंटाळा येऊ लागला. अर्थातच असा एक रेडिओ खरेदी करणे भाग पडले की त्यावर कॅसेट प्लेअरही होता. पहिल्यांदा कोऱ्या कॅसेटही महाग वाटायच्या आणि पूर्वमुद्रित ध्वनिफिती मिळत नव्हत्या. त्या काळात काही जणानी आपल्याला नको असलेल्या फिती विकायला काढल्या व त्यावर पुन्हा हवे असलेले संगीत ध्वनिमुद्रित केले तरी चालत होते. अश्या बऱ्याच जुन्या फिती मी त्यावेळी घेतल्या.

थोड्याच दिवसात पूर्व ध्वनिमुद्रित फिती बाजारात फारच स्वस्तात मिळू लागल्या त्या बहुधा मूळ फितींची नक्कल करून (पायरेटेड) तयार केलेल्या असत. मग तश्या अनेक फितींचा भरणा माझ्याकडे झाला. आणि कपाटातील एक कप्पा अश्या फितींनी भरून गेला तोवर सीडीचा जमाना सुरू झाला. आणि आता तर यू ट्यूब चा जमाना आल्यामुळे कोणतेही गाणे नुसते कळ दाबताच हजर!





संगणक प्रथम मला वापरण्याची पाळी आली ती अभियांत्रिकीमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमातील प्रॉजेक्टसाठी. त्यावेळी अक्ख्या महाराष्ट्रात एक संगणक होता तो टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फन्डामेन्टल रिसर्च या संस्थेत. त्याचा आकारएवढा मोठा होता की एक आख्खा हॉल तो व्यापून टाकी. पुण्यात राहून आम्ही आमच्या प्रॉजेक्टसाठी संगणकीय भाषेत कार्ड पंच करून तो कार्डांचा गठ्ठा मुंबईस पाठवायचो. तेथील भव्य संगणकात त्यांची छाननी व्हायची व योग्य प्रकारे ती तयार झाली असली तर आमच्या समीकरणाची उत्तरे आमच्या हातात यायची नपेक्षा तो कार्डांचा गठ्ठा परत यायचा त्यातील चुकांच्या यादीसह. मग पुन्हा आम्ही ती कार्डे पन्च करून पाठवायचे. त्यावेळी प्रॉजेक्टच्या विषयापेक्षा व त्यातून मिळणाऱ्या रिझल्ट्सपेक्षा हे कार्ड पंचिंग करणे, पाठवणे, दुरुस्त करणे हे काम हाच मोठा प्रॉजेक्ट असे. आताच्या संगणकावर जे उत्तर पाच मिनिटात मिळेल तेच उत्तर आम्हाला सहा महिन्यात मिळे व तोच आमचा प्रॉजक्ट समजण्यात येई. शिवाय त्यासाठी मुंबईच्या एक दोन वाऱ्याही कराव्या लागत.

हळू हळू संगणकाचा आकार लहानलहान होत गेला इतका की तो आता मोबाइलच्या स्वरुपात खिश्यात बसू लागला. पण आता नव्या पिढीला मात्र त्याचे काहीच विशेष वाटत नाही. दोन तीन वर्षाची माझी नात एक दिवस मोबाइल कानाला लावून काहीतरी ऐकत होती. ती काय ऐकते हे तिच्या आईला विचारल्यावर तिने दिलेल्या उत्तराने मी अगदी चाट झालो, "अहो ती तिचेच गाणे रेकॉर्ड करून ऐकत असते. " म्हणजे मला अजून मोबाइलवरून फोन करण्यासाठी कुठले बटण दाबावे च घेण्यासाठी काय करावे याचा गोंधळ उडतो





तर आता तिची धाव पाहून आचंबित झालओ. थोडक्यात . आमची पिढी अश्या प्रकारे पाठांतरात वाकबगार असली तरी नव्या नव्या गोष्टींशी जुळवून घेण्याच्या बाबतीत मात्र कमी पडते हे निश्चित. तर येथे ही तीन वर्षाची पिटुकली आपलेच गाणे स्वत:च रेकॉर्ड करून ऐकत होती. उद्या बोलताही न येणारे एकादे पिटुकले मोबाइलवरून आपल्या आईला "ए आई मला दूध पाजायची वेळ झाली"असा एस. एम. एस. करून सांगते असे कळले तरी त्याचे आश्चर्य वाटायला नको.





# ९. तंबूतला सिनेमा

आमच्या लहानपणी चित्रपट हा भारदस्त शब्द क्वचितच वापरला जायचा. सिनेमा हाच शब्द प्रचारात होता आणि आमच्या गावातल्या लोकांनाही तोच समजायचा. अर्थात गावात सिनेमाथेटर नसल्याने गावातल्या लोकांची सगळी भिस्त असायची ती जत्रेत येणाऱ्या टुरिंग टॉकीजमध्ये वर्षातून एकदा पहायला मिळणाऱ्या सिनेमावर. कधीतरी चुकुन माकुन सातारा किंवा कराडसारख्या आमच्या गावाच्या मानाने शहरात जमा होणाऱ्या परगावी गेल्यावर त्या प्रवासाची सांगता बऱ्याच दिवसाचा सिनेमाचा उपास सोडून होणार हे जवळजवळ ठरलेलेच असे.

गाव सोडण्याची संधी क्वचितच मिळत असल्यामुळे आम्हा भावंडांना सिनेमा पहाण्याची हौस जत्रेतच भागवावी लागे. पौष महिन्यात आमच्या गावची जत्रा भरायची. त्यावेळी गावाबाहेर म्हणता येणार नाही पण गावातही म्हणता येणार नाही अशा एका शेताच्या जागी ही जत्रा भरायची. पौष महिना असल्याने



त्या शेतातील पिके काढून शेत मोकळे केलेले असायचे. त्यावेळी आमची शाळा संस्थानी अमलामुळे सकाळी आठ ते अकरा आणि दुपारी दोन ते पाच असे. एकादे दिवशी त्या भागात रहाणाऱ्या कुणातरी मित्राकडून तोंडून "अरे जत्रेची पाल यायला लागली" अशी बातमी लागायची आणि सकाळी शाळा सुटल्यावर आमचा मोहरा त्या शेताकडे वळायचा पौषाच्या सुरवातीस हवेत छान थंडी असे. शाळेत मधल्या सुट्टीत खाणे झालेले असे त्यामुळे घरी जाण्याची फारशी घाई नसे. गावाचा विस्तारच इतका कमी की शाळेतून त्या शेतावर जायला फारफारतर पंधरा मिनिटे लागायची आणि आम्ही आतुरतेने ती पहिलीवहिली पालं पहायला लागायचे. पालं म्हणजे छोटे तंबूच असायचे. पहिलीवहिली पालं तर कापडीच असायची. तुरळक पसरलेलीपाले पाहिल्यावर अंगावर आनंदाचे रोमांच उभे रहायचे. कारण जत्रा सुरू झाल्याची वर्दी ती देत असत. त्यानंतर मोठी म्हणजे मिठाईची, तांब्यापितळेच्या भांड्यांची, फोटोची अशी दुकाने येत ती मात्र बहुधा पत्रे उभे करून तयार केलेली असत. संस्थानी कारभार असल्याने अगदी व्यवस्थित आखणी करून पाले टाकलेली असत. उभे आडवे रस्ते अगदी व्यवस्थित आखून मगच पाले उभारल्यामुळे

जत्रेत फिरायला नंतर मजा वाटायची तरीही लहानपणी आईबापांच्या बरोबर गेलेली पोरे चुकण्याचे प्रसंग घडायचेच पण एकादे पोर

पार सापडलेच नाही असे मात्र कधी घडले नाही.

सगळयात शेवटी यायची ती म्हणजे टुरिंग टॉकीज आणि सर्कसचे तंबू. हे आमच्या त्या वेळच्या कल्पनेने अवाढव्य मोठे असायचे.

जत्रा चांगली भरली तर आठ दहा टुरिंग टॉकीज आणि दोन दोन सर्कशी येत पण असे प्रसंग कमीच. चार पाच टॉकीज आणि एक सर्कस म्हणजे अगदी डोक्यावरून पाणी. पहिली टॉकी बहुतेक आमच्या गावच्याच कोंडाजींची अशोक टॉकी असे आणि त्यानंतर एका मागून एक टॉकीज आल्याची बातमी कानावर पडून आमचे कान धन्य होत आणि लगेच संध्याकाळी आमच्या मित्रमंडळांची पहाणीसमिती जत्रेस भेट देऊन त्या बातमीची सत्यता पडताळून पहायची.

कितीही टॉकीज आल्या तरी आपल्याला एकादा दुसराच सिनेमा पहायला मिळणार हे मला चांगलेच माहीत होते. तरीही तो अनुभव म्हणजे एक "उघडले स्वर्गाचे द्वार"या प्रकारचा असायचा. त्या अगोदर बॅंड बाजासह सकाळी नऊ आणि दुपारी चार वाजल्यापासून पुढे निरनिराळ्या टॉकीजच्या सिनेमाच्या जाहिराती गावात फिरत. या जाहिराती एका तिकोनी गाड्यावर लावून ढकलत ढकलत टॉकीजमधले कामगार गावभर फिरत. त्या गाड्याबरोबर कर्ण्यातून सिनेमाचे नाव ओरडून सांगणारे कामगारही असत.

प्रत्येक टॉकीजमध्ये दररोज दोन खेळ एक संध्याकाळी सहा वाजता आणि दुसरा रात्री नऊ वाजता असे आणि दोन्ही खेळ वेगवेगळे असत. म्हणजे पाच टॉकीजमध्ये एकादिवशी दहा खेळ होत. कोणताही खेळ लागला तरी तो आपण पहायलाच पाहिजे असे वाटे कारण तो पहायला मिळण्याची शक्यता बहुधा कमीच असे पण एकादा श्यामची आई वगैरे लागला तर मात्र वडिलांना



विचारण्याचे धाडस तरी मोठी बहीण करी आणि बरेचदा तिला यश मिळे. मग काय विचारता तो दिवस म्हणजे "अजी सोनियाचा घनु--- "च असायचा.

सिनेमाला जाण्याच्या कल्पनेने तो दिवस कसा निघून जायचा काही समजायचेच नाही. नऊचा सिनेमा असेल तर आठपासून आमची घाई सुरू व्हायची. त्यावेळी तिकिट असायचे पाच आणे. आम्ही भावंडे आणि आई अशी सगळी मंडळी जेवणखाण आटोपून निघेपर्यन्त उशीर हा व्हायचाच. मात्र सिनेमा तंबूत असल्यामुळे हाउसफुलचा धोका कधीच नसायचा, तंबू कमी पडला तर बाजूच्या कनाती सोडवून तंबूची क्षमता कितीही वाढवता येण्याची सोय होती. असे कनाती वाढवावे लागणे ही त्या सिनेमाच्या लोकप्रियतेची पावती असायची. वेळेवर पोचावे ही इच्छा तर असायची पण सगळयांची जेवणे विशेषत:आई येणार असेल तर तिचे जेवण सगळयात शेवटी होत असल्याने आणि त्यानंतर घरातली जमीन सारवून काढावी लागत असल्याने अशा सगळया भानगडीतून हमखास उशीर व्हायचा त्यामुळे आम्ही पोरे अगदी रडकुंडीला यायचो, बर स्वतंत्रपणे जायची कुवत आमच्यात नव्हती आणि वडील तसे सोडण्याची शक्यताही नव्हती.

शेवटी आम्ही मार्गी लागायचो तेव्हां सिनेमा सुरू होण्याच्या अगोदर वाजणाऱ्या शहनाईची रेकॉर्ड लागल्याचे सूर कानावर पडायचे आणि गेले सिनेमातले पाच मिनिट गेले असे वाटून अगदी बाजीचे पंचप्राण गेल्यावर महाराजांना व्हावे तितकेच दु:ख आम्हाला व्हायचे.





मात्र कधीकधी याउलटही प्रकार घडायचा म्हणजे जर सिनेमा सहाचा असेल तर जेवण हा प्रकार त्यानंतर असायचा आणि त्यामुळे अगदी वेळेच्या अगोदरच आम्ही तंबूत शिरायचे. प्रवेश हा नेहमी पडद्याच्या पाठीमागून असायचा त्यामुळे तंबूत शिरल्यावर पांढऱ्या पडद्याचे मागूनच दर्शन झाले की स्वर्गातच प्रवेश झाला असे वाटायचे. पडद्याच्या पुढे पडद्यापासून ते थेट मागील बाजूस जेथे प्रोजेक्टरया गाडीपर्यंत एक आडवा दोर पडद्याशी काटकोणात तंबूचे बरोबर दोन भाग करणारा असे त्यात दोन भागात स्त्री आणि पुरुष अशी विभागणी असे. (अशी विभागणी पुढे सोलापूरला गावातल्या प्रभात व आणखी काही सिनेमागृहात पहायला मिळाली. औरंगाबादला तर सुरवातीस मागील बाजूसही आडवा पडदाच असे आणि पडदानशीन स्त्रियांची त्यामागे व्यवस्था असे हा निजामी अमलाचा परिणाम. )संसदेत ३० टक्क्याना विरोध करणाऱ्या पब्लिकला तंबूतली ही ५० टक्क्याची विभागणी मात्र बिनतक्रार मान्य असे. तंबूतील विभागणीत आम्ही मुले दोन्ही बाजूपैकी आमची वडीलधारी मंडळीअसत त्या बाजूस म्हणजे बायकांच्याच बाजूस-(कारण वडील सिनेमास क्वचितच येत आणि आलेच तरी त्यांच्या मित्रमंडळीं बरोबर रहात)जात असू. जाताना बरोबर खाली अंथरण्यासाठी सतरंजी अगर घोंगडे नेलेले असे ते योग्य जागी पसरण्याची जबाबदारी आमच्यावर असे. ते शक्यतेवढे मोठे पसरण्याची खबरदारी आम्ही घेत असू कारण कधी कधी आमच्यापैकी काहीजणाना झोप येण्याची शक्यता असे. बरोबर खाद्यवस्तूंचा भरपूर साठा नेणे आवश्यक असे कारण सहाच्या सिनेमाच्यानंतर जेवण असे. अर्थात या खाद्यपदार्थात जत्रेतच उपलब्ध असणाऱ्या चुरमुऱ्यांचा महत्वाचा भाग असायचा. त्यामुळे जत्रेच्या





सुरवातीसच आमच्या घरात चुरमुऱ्याचे एकादे पोतेच विकत घेतले जायचे सहाच्या सिनेमाला गेलो तरी आईला सगळ्यात शेवटीच यावे लागे त्यामुळे तिच्या येण्याकडे आमच्या जागेवरून लक्ष ठेवावे लागे आणि ती आल्यावर वेगवेगळया पद्धतीने तिचे लक्ष वेधावे लागे. अशा उशीरा येणाऱ्या आया आणि त्याच्या मुलांच्या हाकाऱ्याने सिनेमा सुरू झाल्यावरचा काही काळ दणाणून जात असे.

अर्थात असे क्वचितच घडे कारण सहाचा सिनेमा सहाला किंवा नऊचा सिनेमा नऊला सुरू करण्याचे बंधन कोंडाजीभाईना मान्य नसे. आम्ही स्थानापन्न झाल्यावर बऱ्याचदा चालू सिनेमातली गाणी कर्कश्शपणे लागत. ती ऐकून अगदी पाठ झाली तरी सिनेमा सुरू होण्याचे नाव नसे. तंबूत सगळ्यात मागे काही लाकडी आणि लोखंडी खुर्च्या टाकलेल्या असत त्यावर बसणारी गावातील प्रतिष्ठित मंडळी म्हणजे पोलिस इन्स्पेक्टर. डॉकटर अशा प्रतिष्ठित आणि निमंत्रित मंडळींचे आगमन होण्याची वाट बघितली जाई, सिनेमा सुरू होण्याचे चिन्ह म्हणजे प्रोजेक्टरच्या गाडीवरील दोन दिव्यांपैकी एक दिवा घालवणे तसा तो गेला की चला आता सिनेमा सुरू होणार असे वाटून पुढील इच्छापूर्तीच्या आनंदाने काळीज धकधकू लागे. त्याचबरोबर उ. बिस्मिल्लाच्या शहनाईची एक तबकडी हमखास वाजू लागे. तेवढे झाले की आता खरोखरच स्वर्ग दोनच बोटे उरला असे वाटू लागे आणि दुसरा दिवाही बंद झाला आणि "शान्त रहा"ची पाटी पडद्यावर दिसू लागली मग मात्र खरेच स्वर्गभूमीत प्रवेश केला असे वाटू लागे.





त्यावेळचे बहुतेक सिनेमे कृष्णधवलच असत. ( जे. बी. एच. वाडियाचे भगभगीत रंगाचे काही त्याला अपवाद ) तरी त्यातही चालतीबोलती चित्रे समोर दिसू लागली की आम्हाला आनंदाचे अगदी भरते येई. पण हा आनंद फार काळ टिकत नसे कारण दहा पंधरा मिनिटे होतात न होतात तो कटकन फिल्म तुटे आणि एकदम विधवेच्या कपाळासारखा पांढराफटक पडदा समोर दिसू लागे. जत्रेत आणलेले सिनेमे बहुधा अनेक ठिकाणी घासून घासून फिल्म अगदी जीर्ण झालेली असे त्यामुळे दर दहा पंधरा मिनिटांनी ब्रेक घ्यावा लागे आणि त्यावेळी लोकांच्या मोठ्या आरड्याओरड्यास तोंड द्यावे लागे अर्थात तंबूच्या मालकाला आणि आम्हालाही याची संवय असे त्यामुळे सिनेमा हळू हळू पुढे सरकत असे. पण तसाही तो आम्ही आमच्या सहनशील स्वभावास अनुसरून आनंदाने पहात असू. कदाचित पुढे टी. व्ही. वरील मालिका वा सिनेमे पहाण्याची ती रंगीत तालीमच कोंडाजीभाई आमच्याकडून करून घेत होते.

तंबूच्या सिनेमास तिकिट पाच आणे असले तरी तेवढेही पैसे नसत पण सिनेमा बघायची हौस तर दांडगी असे आमचे काही मित्र धाडसाने कनात वर करून आत घुसण्याचा प्रयत्न करत आणि कनातीजवळ सर्व बाजूना जरी टॉकीजमालकाचे कामगार पहारा देत आणि जो आत घुसताना सापडेल त्याला बेदम चोप देत असे असले तरी त्यातले काही शिवाजीमहाराजांच्या मावळयांच्या चपळाईने कनातीतून आत घुसत आणि अशा तऱ्हेने सिनेमाचा आस्वाद घेतल्याचे दुसऱ्या दिवशी संताजी धनाजीने मोगलांच्या तंबूचे कळस कापल्याची बातमी सांगावी त्या थाटात सांगत. मला ती चपळाई दाखवणे तर



दूरचपण सरळ सरळ समोरच्या प्रवेशद्वारातूनही कधीकधी प्रवेश करायला अडचण व्हायची.

एकदा माझा "गुळाचा गणपती" सिनेमा बघायची संधी अशीच हुकली. आमच्या नात्यातले एक गृहस्थ टूरिंग टॉकीजना सिनेमाची रिळे पुरवणाऱ्या कंपनीचे कर्मचारी होते आणि काही सिनेमांची रिळे ते घेऊन येत आणि त्यानी आणलेल्या रिळांचा सिनेमा चालू असेल तर त्यांच्या परिचयाच्या काही लोकांना तो सिनेमा फुकटात पाहू देण्यास टुरिंगचे मालक तयारी दाखवायचे. अशा पद्धतीने एकदा आमच्या कुटुंबातील सभासदांना गुळाचा गणपती पहाण्याचा योग आला. पण माझे आणि माझ्या भावाचे "दैव देते आणि कर्म नेते"अशी परिस्थिती झाली, कारण आम्ही फार अभ्यासू असल्याने बाकीचे सभासद अगोदर गेले तरी आम्ही अभ्यास पुरा करूनच येऊ असे त्याना सांगून घरातच बसलो आणि खरोखरच अभ्यास पार पाडून भर भर दोघे तंबूकडे धाव घेतली. तसा गुळाचा गणपती सर्वत्र खूपच प्रसिद्ध पावला असल्याने गावातील सगळी गर्दी त्याच टॉकीवरच लोटली त्यामुळे प्रवेशासाठी उभ्या केलेल्या लाकडी आडव्या काठ्यावरून गर्दी ओसंडून वहात होती. टॉकीजच्या मालकास जरी आमच्या त्या नायेवाइकाने सांगून ठेवले असले तरी आमच्यासारख्या पोरांकडे थोडेच त्यचे लक्ष जाणार आणि घरातली मंडळी तर केव्हांच आत गुप्त झालेली. आम्ही केविलवाण्या नजरेने मालकाकडे पहात राहिलो पण त्यालाही तेवढ्या गर्दीत आमच्याकडे लक्ष देणे जमले नाही आणि बरीच वाट पाहून आम्ही राम लक्ष्मण सिनेमाच्या सीतेचा शोध न घेताच घरी



परत जाण्याचा निर्णय घेतला आणि शेवटी गुळाचा गणपती आमचा हुकलाच. नंतर मी तो दूरदर्शबवरच पाहिला. माझ्या भावाने तर तेव्हापासून सिनेमाचा एवढा धसका घेतला की त्यानंतर

त्याने आजतागायत सिनेमाचे नावच कधी काढले नाही.





# १०. दिवस बिनाकाचे!

दिवसाची सुरवात मंगल प्रभातच्या सनईने होण्याची शकयता माझ्या बालपणी नव्हती कारण रेडिओचा आमच्या घरालाच काय पण आख्या गावाला स्पर्श झाला नव्हता. माझ्या वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षी ज्या घरात आम्ही रहायला आलो त्यासमोर असलेल्या दिलखुष हॉटेलमध्येएक मोठ्ठा कर्णा बसवलेला ग्रामोफोन (त्यावेळच्या आमच्या भाषेत फोनो) दिवसभर वाजत असे आणि त्यावर " ओ दूर जानेवाले " या एकाच गाण्याचे दळणदिवसभर चालू असायचे. माझ्या वडिलांच्या एका स्नेह्याकडेही तसलाच फोनो होता आणि त्यावर " गेला दर्यापार घरधनी " हे गाण ऐकायला मिळायचत्यानंतर नेहमीच्या प्रथेला अनुसरून वर्षादोन वर्षांनी वडिलांनी दुसरे घर भाड्याने घेतले, त्यात मला आवडणाऱ्या दोन गोष्टी होत्या. एक म्हणजे या घराला माडी होती आणि दुसरे म्हणजे समोरच शंकरराव नावाच्या हरहुन्नरी माणसाचे दुकान होते . वरवर पहायला ते सायकली दुरुस्त करण्याचे व भाड्याने देण्याचे दुकान असले तरी या माणसाला कोणतीही गोष्ट दुरुस्त करायचा नाद





होता त्यामुळे त्याच्या दुकानात आणि समोर नाना वस्तूंचा ढीग पडलेला असे त्यामुळे त्याचे दुकान नक्की कोणत्या वस्तू दुरुस्त करण्याचे होते याचा पत्ता लागणे कठीण असे. पण दुरुस्ती करताना किंवा करत नसला तरी त्याच्याकडे असलेल्या फोनोवर दिवसभर तो गाणी लावायचा, आणि ती आमच्या घरी अगदी सहज माझ्या कानापर्यंत पोचत आणि त्या सुरात अभ्यास करत असताना मी गुंगून जात असे. त्या काळात तेथे’"वसंतबहार" "कठपुतली" "तुमसा नही देखा" जनमजनमके फेरे" अशा वेगवेगळया सिनेमांची गाणी ऐकायला मिळायची. अर्थात ही त्या त्या सिनेमातली गाणी असल्याचे केवळ काही गाण्यातच त्या सिनेमांची नावे आल्यामुळेच मला कळले होते..

पण शंकरकृपेने गाणी ऐकायला मिळाली तरी हवी तेव्हां ती ऐकायला मिळत नसत. माझी हौस खऱ्या अर्थाने भागली ती मी पुण्याला शिक्षणाला पुण्याला आल्यावर. फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेऊन मी वसतीगृहात रहायला गेलो तेव्हां!जेवणासाठी वसतीगृहाजवळ सहा क्लब होते आणि त्याना जोडून एक मनोरंजन कक्ष होता. त्यात कॅरम. , बुद्धिबळ अशा बैठ्या खेळाचे सामान आणि विशेष महत्वाचे म्हणजे एक माझ्या समजुतीप्रमाणे एक उत्तमपैकी (कारण चांगला रेडिओ मी प्रथमच पहात होतो) रेडिओ ठेवलेला होता.. संध्याकाळी जेवल्यानंतर तेथे बसून कॅरम खेळणे आणि रेडिओवर गाणी ऐकणे हा मग आमचा संध्याकाळचा कार्यक्रम असे. आणि तेथे माझ्यासारखाच एकसंगीतप्रेमी मित्रमला मिळाला. तो बार्शीसारख्या आमच्या गावाच्या मानाने

शहर म्हणता येईल अशा ठिकाणाहून आल्यामुळे चित्रपटसंगीताचे त्याचे ज्ञान माझ्या कितीतरी पटीने अधिक होते

एक दिवस संध्याकाळीप्रफ़ुल्ल (मित्र) म्हणाला "आज बिनाका, तेव्हा जेवण लवकर आटोपून घ्यायला पाहिजे" त्यावेळपर्यंत बिनाका ही काय भानगड आहे हे मला माहीतच नव्हते. आणिमी त्याला तसे विचारल्यावर तो माझ्याकडे अगदी अविश्वासाने पहायला लागला (हल्ली बाकुगान म्हणजे काय असे मी विचारल्यावर माझा नातू माझ्याकडे असा बघतो. )पण मग खरेच मला काही माहीत नाही हे ध्यानात आल्यावर त्याने मला बिनाका गीतमाला, अमीन सायानी वगैरे गोष्टी समजावून सांगितल्या. त्यादिवशी आयुष्यात पहिल्यांदाच मी बिनाका गीतमाला ऐकली. आणि त्यानंतर गाणी ऐकण्यासाठी बराच वेळेचा अपव्यय म्हणजे आमच्या दृष्टीने सदुपयोग आम्ही करू लागलो. रेडिओ सिलोनवरील सकाळची फरमाइश आम्ही फर्गसन रस्त्यावरील त्यावेळी असलेल्या कॅफे वेलकम(याचेच बहुधा प्रख्यात होटेल वैशालीत रूपांतर झाले) किंवा दुसऱ्या एका उडिपी हॉटेलमध्ये बसून ऐकायचे तर, विविध भारतीची दुपारची फरमाइश सुद्धा काही लेक्चरना दांडी मारूनसुद्धा आम्ही ऐकत असू.

त्याचवेळी त्याच रस्त्यावर "स्वरविहार ’ नावाच्या रेकॉर्ड लायब्ररीचा पत्ता आम्हाला लागला. तेथे त्या वेळी एक किंवा दोन आण्यात एक रेकॉर्ड ऐकायला मिळायची, त्यानंतर काही इराणी हॉटेलात ज्युक बॉक्स आली त्यात मात्र एक गाणे ऐकायला चार आणे लागायचे शिवाय त्यासाठी वसतीगृहापासून बरेच

अंतर चालावे लागे त्यामुळे आमचा भर दिवसा जवळच्या हॉटेलातील आणि संध्याकाळी मनोरंजन कक्षातीलरेडिओवरच असे.

त्यावेळी आमच्यात निरनिराळया संगीत दिग्दर्शकाच्या फॅन्सचे गट असत. खर तर त्यावेळी सर्वच संगीत दिग्दर्शक ऐन भरात होते. अगदी शंकर जयकिशनचा सहाय्यक दत्ताराम याने संगीत दिलेला "परवरीश" ही चांगलाच गाजत होता. तर बऱ्याच दिवसांनी सलील चौधरीचा "मधुमती ' सुपरहिट झाला होता. कल्याणजी वीरजींचा " सम्राट चंद्रगुप्त "ही हिट ठरला होता. नंतर त्यानी आनंदजींच्याबरोबर युती करून संगीत द्यायला सुरवात केली होती. व सध्या त्यांचा "सट्टाबाजार " चालू होता.

त्याच वर्षी "उषा खन्ना" या एकमेव संगीत दिग्दर्शिकेने ती पहिलीच संगीत दिग्दर्शिका असल्याने -- आम्ही पुरुषप्रधान संस्कृतीच्या खंद्या पुरस्कर्त्यांनी तिची जरी कुचेष्टा केली तरीतिने जोरात आगमन करून "दिल देके देखो" ची गाणी चांगलीचगाजवली होती हे मात्र मान्यच करावे लागले कारण दिल देके देखो या गाण्याला आम्ही आरती म्हणून हिणवत असलो तरी ती आरती बरेच दिवस बिनकाच्या पहिल्या पादानवर वाजत होती. ऊषा खन्नानंतर मात्र आनंद घन एवढाच काय तो संगीत दिग्दर्शन क्षेत्रात महिलाप्रभाव!

नौशाद वर्षातून अगदी मोजक्याच चित्रपटांना संगीत देत होते. त्यांचे बैजू बावरा वगैरे चित्रपट येऊन गेले होते आणि त्यावेळी " मदर इंडिया"चे संगीत देऊन ते बहुधा विश्रांती घेत होते. त्यानंतर त्यांचा "सोनी महिवाल" आला. आणि त्याचबरोबर पार्श्वगायक म्हणून महेंद्र कपूरचा उदय झाला..



आजच्यासारख्या सारेगमपाच्या स्पर्धा त्यावेळी नव्हत्या पण सी. रामचंद्र, रवी आणि नौशाद यासंगीत दिग्दर्शकांनी महेंद्र कपूरची अशाच प्रकारच्या कार्यक्रमातून निवड केली होती अशी मौलिक माहिती प्रफुल्लने मला दिली.

. ओपींचे "तुमसा नही देखा" आणि "नया दौर" नुकतेच येऊन गेले होते आणि"सोनेकी चिडिया" आणि "फागुन" त्यामानाने कमी गाजत (आणि वाजत) होते.. "सी आय डी " पण अगोदरच येऊन गेला होता. सचिन देव बर्मनच्या सोलवा सालमधील "ऐ अपना दिल तो आवारा " या गाण्याने बिनाकाच्या प्रथम पादानवर जास्तीत जास्त वेळा वाजण्याचा विक्रम केला होता. मदनमोहन मधूनच चमकून जाई. त्या वर्षी त्यांचा ’जेलर " येऊन गेला होता आणि "दुनिया ना माने" मधील एकच गाणे आलटुन पालटुन बिनाकात वाजत होते. तीच गत रोशनची. त्यांचा "अजी बस शुक्रिया" येऊन गेला होता आणि त्यातले "सारी सारी रात तेरी याद " हे एक गाणे पुन्हा पुन्हा ऐकायला मिळत होते पण ते बिनाकात अगोदरच येऊन गेले असावे. त्यांचा "बरसातकी रात" अजून यायचा होता..

चितळकर अण्णांचा बहर ओसरल्यासारखे वाटत होते.. तरी त्या वर्षी देव आनंदच्या " अमरदीप" चे एक गाणे " देख हमे आवाज " बिनाकात मधे मधे डोकावून जाई पण त्याचा मुखडा " यहुदी"तील "ये मेरा दीवानापन " ची नक्कल आहे असे आमचे मत होते. त्यानंतर अण्णांचे "नवरंग" चे संगीत खूप गाजले. पण "स्त्री" मात्र फारसे भावले नाही.




चित्रगुप्त, एस. एन. त्रिपाठी, आणि रवी यांचा मध्यममार्ग असे म्हणजे प्रत्येक वर्षी एक दोन चित्रपट आणि त्यात एक दोन बरी गाणी देणे हा त्यांचा प्रघात होता. आमचा गट शंकर जयकिशनचा होता. कारण त्यावेळी त्यांनी संगीत दिलेल्या प्रत्येक चित्रपटातील जवळ जवळ प्रत्येक गाणेबिनाकातकोणत्या तरीपादानावर वाजत असायचे. आणि एकाच वेळी त्यानी चार पाच चित्रपटांना तरी संगीत दिलेले असायचे. त्याएकाच वर्षीत्यांचे अनाडी, कन्हैय्या, मै नशेमे हूं, छोटी बहन, लव्ह मॅरेज, शरारत, उजाला इतकेचित्रपट चालू असल्याने बिनाकातील सोळापैकी आठापेक्षाही जास्त गाणीत्यांच्या चित्रपटातली असत.

आमच्या मित्रांपैकी एकजण मात्र मदनमोहनचा भक्त होता. तो आम्हाला नावे ठेवून म्हणायचा " काय त्या शंकर जयकिशनचे कौतुक करताय?एक ऍकॉर्डियन आणि व्हायोलीनचा ताफा यापलीकडे काय वाजवतात ते " त्याच्या मते मदन मोहन च्या संगीतातील गोडवा, दर्द वगैरे शंज च्या संगीतात नव्हता. त्याच्या सांगण्यावरून आमच्या मतात बदल होण्याची शक्यता नव्हती ती गोष्ट निराळी. त्या वर्षी ओ. पी. , नौशाद यांचे चित्रपटच न आल्याने त्यांच्या भक्ताना काही बोलायला वाव नव्हता.

बिनाका गीतमाला न चुकता ऐकायला लागल्यावर त्या वर्षी वार्षिक बिनाकात पहिला नंबर कोणता संगीत दिग्दर्शक पटकावतोय याची आम्हाला चांगलीच उत्सुकता होती. त्याबाबतीत मात्र शं. ज. ने आमची निराशा केली कारण त्यावर्षी(१९५९) पहिला नंबर पटकावला सचिनदांच्या " हाल कैसा है





" या आशा आणि किशोरच्या"चलतीका नाम गाडी"मधील गाण्याने. अर्थात तो पिक्चर त्यावर्षी अगदी तुफान करत होता आणि त्यामुळे शं. ज. ने पहिला नंबर न मिळवल्यामुळे जरी आमची निराशा झाली तरी वाईट मात्र वाटले नाही. यापूर्वी मी बिनाका ऐकू लागण्यापूर्वी शं. ज. नी १९५५मध्ये’श्री चारसौ बीस"मधील"मेरा जूता है जापानी" या गाण्यासाठी वार्षिक बिनाकात पहिला नंबर मिळवला होता असे प्रफुल्लच्या स्मृतिकोषातल्या माहितीवरून मला समजले.. पण मी ऐकायला सुरवात केल्यावर त्यानी आपला शिरस्ता मोडून आणखी दोन वर्षे आम्हाला ते समाधान मिळू दिले नाही. शेवटी १९६१ मध्ये " तेरी प्यारी प्यारी सूरत " ला ते मिळाले पण त्यावेळी आमचा भक्तमेळा फुटला होता.

त्यावेळी वसंत देसाईंच्या "गूंज उठी शहनाई" ने बिनाका बरीच गाजवली होती. तर खैय्यामसारख्या आमच्या दृष्टीने किरकोळ संगीत दिग्दर्शकाचा " फिर सुबह होगी " बराच गाजत होता.. रवीचा "दिल्लीका ठग"ही गाजत होता. तसाच एन. दत्ता यांचा "धूलका फूल" सज्जाद हे नावही आम्हाला माहीत नव्हते आणि ते माहीत व्हायला पुढे बरीच वर्षे जावी लागली. मात्र त्यावेळी अगदी टुकार संगीतकाराच्या संगीतात गोडवा असायचा हे आता त्यांची काही गाणी ऐकायला लागल्यावर समजते.

केवळ त्याच काळात संगीत देऊन आम्हाला माहीत झालेले संगीतकार म्हणजे आदि नारायण राव. यांनी "सुवर्णसुंदरी " या एकाच चित्रपटाचे संगीत देऊन बिनाकात चांगलीच खळबळ माजवली.. त्यातही " कुहू कुहू" ह्या एकाच



गाण्यान, त्या चित्रपटात चक्क तेरा गाणी होतीअजूनही शास्त्रीय फिल्मसंगीत म्हटलेकी पहिल्यांदा कुहू कुहू च आठवते. मूळदाक्षिणात्य चित्रपटांनाच संगीत देणाऱ्या आदि नारायण रावांचा हिंदी चित्रपटसृष्टीत एवढाच प्रवेश. त्यानी नंतरही "फूलोंकी सेज"या एकमेव हिंदी सिनेमाला संगीत दिलेले आढळते पण तेही काही फार ध्यानात रहाण्यासारखे नव्हते..

अगदी तसेच नाही तरी त्यावेळी तरी फक्त एका "सारंगा" या चित्रपटाच्या संगीतामुळे लक्षात राहिले ते सरदार मलिक!. हे अनु मलिक याचे वडील हे नंतर कळले. (कदाचित त्यावेळी अनुचा जन्मही झाला नसेल. ). त्यानी त्यापूर्वी "आबे हयात"या चित्रपटाला संगीत दिले होते म्हणे. ! तसेच इक्बाल कुरेशी हेही फक्त एका "लव्ह इन शिमला" मुळे ध्यानात राहिले. नंतर व पूर्वीही त्यांनी संगीत दिले होते तरीही!

त्यावेळच्या संगीत दिग्दर्शकांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येकाच्या संगीताचा बाज अलगच असायचा. आणि त्यामुळे कोणतेही गाणे ऐकले की हे अमुक एका संगीत दिग्दर्शकाचे असावे असा अंदाज आम्ही करत असू आणि सहसा तो चुकत नसे.

ज्या संगीतकारांचे एकही गाणे आम्हाला बिनाकात ऐकायला मिळाले नाही असेही काही होते. त्यांची गाणी विविध भारतीवर ऐकायला मिळायची. त्यात एक म्हणजे हन्सराज बहल. कदाचित त्याना चांगले चित्रपट न मिळाल्याचाही परिणाम असेल. तसेच दुसरे एक तसेच संगीतकार म्हणजे हेमंतकुमार. तशी त्यांनी गाइलेली काही गाणी मात्र बिनाकात वाजत आणि





गाजतही होती. सोलवा साल "ऐ अपना दिल तो आवारा " आणि सट्टाबाजारमधील "तुम्हे याद होगा "ही त्यातील दोन महत्वाची.. त्यापूर्वी "नागिन" ची त्यांनी संगीत दिलेली गाणी खूपच गाजली होती. त्यानंतर पुढे त्यांचे " बीस साल बाद" आणि "साहिब बीबी और गुलाम" आले.

पुढे काही काळ बिनाका ऐकणे हा एक महत्वाचा कार्यक्रम होता. बिनाकामुळे फिल्मसंगीत ऐकण्याची गोडी लागली आणि नंतर ती शास्त्रीय संगीत ऐकण्यापर्यंत वाढलीही. ! पण अजूनही ती गाणी ऐकली की त्या महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणी जाग्या होतात.. तो चित्रपटसंगीताचा सुवर्णकाळच होता असे म्हणावे लागेल.

त्यावेळचे फारच थोडे संगीत दिग्दर्शक स्वतः गायचे. एस. डी. बर्मन सी रामचंद्र हे अपवाद! हेमंतकुमार प्रथम गायकच होते.

त्यामानाने आजकालच्या संगीत दिग्दर्शकांना स्वतः गाण्याची हौस जास्त दिसते.





# ११. अस्मिता आणि असहिष्णुता

नुकताच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मराठी भाषादिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील सर्व शाळातून मरठी विषय आवश्याक करण्याचा आदेश दिला आहे. खरे तर शिवसेनेची स्थापनाच मराठी या मुद्द्यावर झाली होती आणि माननीय बाळासाहेबांच्या काळातही मराठी भाषेत फलक लावण्यासाठी बऱ्याच फलकांची मोडतोडही झाली होती. तरीही अजून पुण्यासारख्या अस्सल मराठी शहरातही दुकानावरच नव्हे तर अगदी मराठी माणसाच्या घरावरील नावेही इंग्रजीतच असलेली आढळतात ही वस्तुस्थिती. अगदी आमच्या आयडियल कॉलनीतल्या एका घराचे नाव आर्चिड (ऑर्किड नाही बरं का) आणि दुसऱ्या घराचे क्लोव्हर!

कलर्स मराठी वाहिनीवर ""सूर नवा ध्यास नवा " या कार्यक्रमाने अनेक रसिकांना आकर्षित केले होते.. कार्यक्रम कसा आहे यावर चर्चा न करता त्यातील मला जाणवलेली एक बाब म्हणजे जे कलाकार मराठी भाषिक नाहीत



अश्या कलाकारांच्या मराठी वरील वा मराठी गीते गाण्याच्या प्रभुत्वाविषयी परीक्षकांचे कौतुकोद्गार!. सुमित राघवन स्वत:स महाराष्ट्रीय म्हणवून घेतात. त्यांचा सगळा जन्म महाराष्ट्रातच गेलाय अगदी दूरदर्शनवर त्यांचा प्रवास मराठी मालिकेपासूनच सुरू झालाय, तरी त्यांच्या मराठीवरील प्रभुत्वाचे इतके कौतुक केवळ त्यांचे आई वडील मराठी भाषक नव्हते या एका कारणासाठी करणे फारसे योग्य आहे असे वाटत नाही. तीच गोष्ट अय्यर या गायिकेविषय्री. तिचेही वास्तव्य आणि जन्मही महाराष्ट्रातला आहे म्हणजे तिला मराठी चांगले बोलता, वाचता, लिहिता येणे क्रमप्राप्तच आहे. ( पण तसे तिला येत नाही हे तिच्या प्रतिसादावरून कळते)कार्यक्रमात राजू नदाफ व आणखी एक औरंगाबादचा मुस्लिम धर्मी गायकयांचे कौतुक करताना"तुझी मातृभाषा मराठी नसून---" असा सूर परीक्षक लावतात.

आपल्या भाषेच्या बाबतीत आपण मराठी भाषक सहिष्णुतेची अगदी परिसीमा आहोत असे म्हणता येईल. परक्या व्यक्तीशी बोलायला सुरवात करताना आपण प्रथम इंग्लिशमध्येच सुरवात करतो, (म्हणजे आपले इंग्लिश फार उच्च दर्जाचे वगैरे असते म्हणून नाही) पण ते शक्य नसेल तर मग आपण हिंदीत सुरवात करतो. म्हणजे मुंबईत गेल्यावर टॅक्सीमध्ये बसताना आपण "टॅक्सी खाली है क्या?" असेच विचारतो येवढेच काय पुण्यातही रिक्षा खाली है क्या असेच विचारतो. दुकानदाराने हिंदीत बोलण्यास सुरवात केली तर आपणही आपले राष्ट्रभाषा प्रेम लगेच व्यकत करू लागतो. खरे तर महाराष्ट्रात जन्मल्यावर व अनेक वर्षे वास्तव्य झाल्यावर त्यांचे मराठीवर प्रभुत्व जरी नसले





तरी मराठी व्यवस्थित बोलता येणे अपेक्षितच आहे.. माझे मुस्लिम मित्र उत्तम मराठी बोलतात. , उलट त्यांचे हिंदीच "भागते भागते आया अन धबाकदिशी पड्या " असे होते. ( माझी बहीण बडोद्यात रहायला लागल्यावर दोन वर्षात गुजराती भाषेत उत्ताम भांडू लागली . खरा भाषेचा कस भांडताना लागतो म्हणून या गोष्टीचा उल्लेख केला. ) कदाचित सध्या बऱ्याच मराठी भाषकांना स्वत:लाच मराठी व्यवस्थित बोलता येत नसल्यामुळेअश्या मुस्लिम किंवा तमिळ गायकांनी मराठी गीते उत्तम म्हणावी याचे कौतुक वाटत असावे. मराठी वाहिन्यांवरील शुद्धलेखन वाचून तर कीव येते तर संवादही तसेच असतात. "मला मदत कर" या वाक्याचे आता कायम "माझी मदत कर " असे हिंदी रूपांतर झाले आहे.

अमेरिकेत गेल्यावर तर काय तेथे तर कोणालाच मराठी येत नसणार याविषयी आपल्याला शंकाच नसते या उलट तेथील गुजराती माणूस मात्र कोणीही भारतीय दिसला तर सुरवात "केम छो" नेच करणार. (आणि आता तर काय स्वतः ट्रंप त्यात सामील झाले आहेत)ही गुजराती अस्मिता म्हणायची की त्याना इंग्लिश येत नाही म्हणून ते नाइलाजाने असे करतात असे त्यांचे समर्थन करायचे?मराठी नेतेही महाराष्ट्रातील अन्यभाषिक मतदारांना कळावे म्हणून आपल्या मोडक्या तोडक्या हिंदीत (हिंदी संपूर्ण भारताची भाषा करावी म्हणणाऱ्यांनाहि हिंदी फार चांगले बोलता येते अशातला भाग नाही ) बोलतात त्यावेळी हा सहिष्णुतेचा भाग आहे असे त्यांचे प्रतिपादन असते मराठी अस्मिता त्यावेळी कोठे लुप्त होते कोण जाणे!





याउलट द. भारतीय म्हणजे विशेषत: तमिळ भाषिक हिंदीत बोलले तर कदाचित प्रत्युत्तर देणारच नाहीत किंवा "I don’t know Hindi" असे स्पष्ट सांगतील. महाराष्ट्रात राहूनही "I don’t know Marathi"असे उत्तर द्यायला त्यांना काहीही अयोग्य वाटत नाही. ही त्यांची असहिष्णुता म्हणायची की भाषिक अस्मिता?अमेरिकेत भारतीय रहिवाश्यांत रहाताना माझ्या नातवांच्या तमिळ भाषिक बालमित्रांना हिन्दीत न बोलता इंग्लिशमध्येच बोलण्याचा त्यांचा आग्रह पाहून त्याबद्दल सुनावले असताना त्यानी सरळ ‘ I hate Hindi" असे उद्गार काढलेले मी पाहिले आहे. म्हणजे ते भाषेच्या बाबतीत असहिष्णू आहेत असेच म्हणावे लागेल. स्वभाषेचा अभिमान म्हणावे तर ते त्यांच्या तमिळ मित्रांशीही इंग्लिशमध्येच संभाषण करत.

बहुतांश दक्षिण भारतीयांना कितीही त्रास सोसावा लागला तरी हिंदी भाषा शिकावी असे कधीच वाटत नाही. अमेरिकेत असताना माझी हुबळीत रहाणाऱ्या पण मराठी व कन्नड दोन्ही जाणणाऱ्या कुलकर्णी (हो तेही कुलकर्णी ) यांची ओळख झाली. आमचे व त्यांचे चांगले संबंध प्रस्थापित झाले आहेत. अमेरिकेत असताना माझ्या मुलाच्या घराजवळ रहाणाऱ्या कन्नड कुटुंबास त्यानी आपल्या घरी यावे असे फार वाटते कारण त्यांच्या पत्नीस कानडीव्यतिरिक्त इतर भाषा येत नाही त्यामुळे त्याच्याबरोबर मी गेलॉ तरी मला कन्नड संभाषण ऐकणेच भाग पडते अश्या वेळी आपल्याबरोबर एक कानडी न जाणणारा गृहस्थ आहे याचे भान त्यांना नसते . एकदा स्वत: ते गृहस्थ असताना आम्हा तिघांचे इंग्रजीत संभाषण होऊ शकले तरीहि भारतीय राजकारणावर

बोलताना मी तेथे असूनही बाळासाहेब ठाकरे यांच्यावर टीका करू नये याचीसुद्धा शुद्ध त्या गृहस्थाना नव्हती अर्थात त्यामुळे त्यांचा समाचार घेणे मला भाग पडले. माझ्या मराठी कानडी मित्रवर्यांनी दुसऱ्या दिवशी मला त्याबद्दल फटकारले नाही हे माझे नशीब!

विश्व धर्म परिषदेस स्वामी विवेकानन्द जात होते तेव्हां त्यांच्या बोटीतच काही ख्रिस्चन पाद्रीही प्रवास करत होते. ते आपापसात बोलत असताना हिन्दु धर्मावर बोलून त्याविषयी कुचेष्टेने बोलू लागले. ती चर्चा स्वामीजी ऐकत होते . काही वेळ ती ऐकल्यावर स्वामी शांतपणे त्या मंडळींकडे गेले आणि त्याना उद्देशून म्हणाले " इतका वेळ आपली चर्चा मी ऐकत होतो. एक हिंदु धर्मीय शेजारी आहे यचा जराही विचार न करता आपण जी टीका करत आहात ती पूर्णपणे अयोग्य आहे. यापुढे मात्र माझ्या धर्मावर टीका केलीत तर मी कोठलाही संयम न बाळगता आपणास समुद्रात फेकून देईन" तेव्हां ते सर्व ख्रिस्चन धर्मोपदेशक चुप बसले. त्यानंतर स्वामी विवेकानंदांनी त्या धर्म परिषदेत आपल्या भाषणाने सर्व धर्मियांची मने जिंकली व हिंदु धर्माची महती सर्व जगास पटवून दिली.

. या घटनेपूर्वी कोणा हिंदु धर्मियाने असे रोखठोक उद्गार काढण्याचे धाडस केले नव्हते. आपण हिन्दु धर्मीय (ज्यात मीही आलो) आम्ही हिंदु धर्म फार महान आहे असे म्हणतो व त्याचबरोबर हिंदु धर्मीय फार सहिष्णु असे आपली पाठ थोपटून घेतो पण त्याच धर्माचे लोक एके काळी त्याच धर्मातील काही व्यक्तींची सावली अंगावर पडणेही अशुभ मानत होते त्या व्यक्तींना अस्पृश्य



मानत होते ज्ञानेश्वरांचा छळ त्यांच्याच जातीतिल माणसांनी जास्त केला. याचा आपल्याला विसर पडतो, आजही जातीय वाद एवढा प्रबळ झालाय की हिंदु धर्मातीलच सर्व जाती एकमेकाविषयी साशंक असतात. नुकताच विधानसभा निवडणुकीत कोथरूड मतदारसंघात ब्राह्मण महासंघाने असा वाद काही काळ उभा केला होता व तो नंतर जरी थांबवण्यात आला तरी त्यातून असहिष्णु वृत्तीचे प्रदर्शन झालेच. यावर हे असहिष्णुतेचे नव्हे तर अस्मितेचे उदाहरण आहे असाही दृष्टिकोण व्यक्त होऊ शकतो. सध्या धार्मिक सहिष्णुता या विषयावर अधिक बोलणे अवघड झाले आहे.

अस्मिता हे असहिष्णुतेचेच सोज्वळ नाव आहे असे समजायचे काय?





# १२. मी नाही त्यातला/ली

माझ्या एका मित्राने स्वत: म्हटलेल्या गाण्याचे ध्वनिमुद्रण Whatsapp वर मला पाठवले ते मला आवडले म्हणून माझ्या दुसऱ्या एका मित्राकडे ते पाठवावे असे वाटले पण त्याच्याकडे Whatsapp नाही हे मला माहीत असल्यामुळे त्याच्या मुलाकडे (त्याचा स्वत:चा व्यवसाय असल्यामुळे) असेल म्हणून त्याविषयी चौकशी करण्यासाठी त्या मित्राला फोन केला पण तो अंघोळीत गुंतल्यामुळे त्याच्या पत्नीने घेतला अर्थात आमचे घरोब्याचे संबंध असल्यामुळे माझ्याशी बोलायला काहीच अडचण नसल्यामुळे ती बोलू लागली. तेव्हां माझा फोन करण्यामागील हेतू तिला सांगितला त्यावर "छे छे तसले काही नसते आमच्याकडे " असे तिने मला जणू बजावलेच. इतर वेळेस अगदी खेळीमेळीने संभाषण करणाऱ्या व्यक्तीने या पद्धतीने बोलणे सुरू केल्यावर मी चकितच झालो. Whatsapp म्हणजे काहीतरी अभद्र गोष्ट असावी असा तिचा सूर वाटला, आणखी तेवढ्यावरच न थांबता"आम्हाला ते आवडत नाही आणि एकादी गोष्ट आम्हाला आवडत नसेल तर कुणी आग्रह केला म्हणून



काही आम्ही बाळगत नाही. "अश्या अर्थाचे उद्गारही तिने काढले व त्याचरून Whatsapp या प्रकाराविषयी तिला फारच तिटकारा असावा असे दिसले. मी काही तसा आग्रह करण्यासाठी तिला फोन केला नव्हता. पण जणू मी त्यासाठीच फोन केला असे समजून पुढे "आम्हाला कोणाशी बोलावे वाटले तर आम्ही फोन करतो " असेही उद्गार तिने काढले, ( तसे बघायला गेल्यास मीही तिच्याशी फोनवरच बोलत होतो). त्यावर तिच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी " बरे ठीक आहे आमच्या मित्रवर्यांचे स्नान आटोपल्यावर त्याला फोन करतो असे म्हटले त्यावर "नाही झालीच आहे त्यांची अंघोळ "म्हणून माझी सुटका होऊ न देता Whatsappविषयी आपल्याला काय अनुभव आले आणि त्याचमुळे अश्या निर्णयास आपण का आलो याविषयी तो बोलत राहिली आता माझ्या स्मार्ट फोनवरही अनेक वेळा ऐकून कान किटण्याची शक्यता असणारे गाण्याचे किंवा वाद्यांचे प्रयोग किंवा पहाताना आपल्यालाच भोवळ येईल असे नृत्याच्या प्रात्यक्षिकांचे विडिओज येतातही व मनात असो वा नसो ते न ऐकता किंवा न पाहताच त्यांना "आवडले" अशी पावती द्यावी लागते तरीही काही महत्वाचे संदेशही पटकन मिळून झटपट काही कामे आटोपतात असा अनुभवही येतो. सध्या "तूच मला आधार" च्या काळात, आधारच्या झटपट निर्गमनासाठी तर त्याचा मला फारच उपयोग झाला हे मान्यच करावे लागेल..

माझ्या मित्राला मग मी माझे फोन करण्याचे कारण सांगून दुसऱ्या कुणाचा फोन उदा: त्याच्या मुलाचा Whatsapp युक्त आहे का याची विचारणा केली.





अर्थात या अगोदर त्याच्या बायकोला विचारण्याचा मूर्खपणा मी केला होता आणि" जे आम्हाला आवडत नाही तेच त्याच्याही बाबतीत लागू होत नाही का?" अशी माझी चंपी झाली होती. त्यांच्या मुलाचा स्वत:चा व्यवसाय असल्यामुळे कदाचित त्याच्या फोनवर Whatsapp असेल अशी माझी गैरसमजूत झाल्याचे तिच्या गळी उतरवण्यापेक्षा मित्राला विचारणे मला योग्य वाटले तरी त्याच्या हातात फोन आल्यावर आपली बायको नेहमीपेक्षा अधिक वेळ माझ्याशी बोलली हे ध्यानात येऊन त्याने हसत हसत, "काय रे तिचं काय बौद्धिक घेत होतास?"असं विचारल्यावर "मी काय बौद्धिक घेणार तेवढी माझी बौद्धिक पातळी आहे असं तुला वाटतं का?" असं विचारल्यावर तो हसू लागला.

बऱ्याच लोकांना अश्या नव्या सुधारणांचं का वावडं असतं मला समजत नाही आणि त्यातही आपण या गोष्टी बाळगत नाही याचा त्यांना अभिमान असतो हे विशेष. बाजारात आलेली प्रत्येक नवी गोष्ट आपल्याकडे असलीच पाहिजे असा अट्टाहास असणाऱ्यांचा एक वर्ग असतो. अश्या लोकांनी पूर्वी, म्हणजे मोबाइल पूर्वीच्या काळात फोनचे विविध प्रकार तर ठेवलेलेच होते पण पाठोपाठ पेजर नंतर अगदी सुरवातीस अगदी एक कॉल करायला वीस पंचवीस रु. व बाहेरून आलेला स्वीकारण्यासाठीही भरभक्कम दर चालू असलेल्या काळातील मोबाइल फोन, त्यानंतर स्मार्ट फोन व त्यानंतर येणारी त्याची प्रत्येक नवीन आवृत्ती स्वत:कडे असायलाच हवी असा त्यांचा अट्टाहास असतो तर त्याच्या अगदी विरुद्ध टोकाची भूमिका असलेला हा दुसरा वर्ग! या वर्गाकडे





संगणक कित्येक दिवस नव्हता. मी अभियांत्रिकि महाविद्यालयात असल्यामुळे त्याकाळात अगदी प्रारंभिक स्वरुपाचे संगणक हाताळले होते तरी प्रोग्रॅमिंग मध्ये फारसा रस मी घेतला नाही पण निवृत्तिनंतर मात्र संगणक वापरणे इतके सुलभ होत गेल्याने सढळपणे त्याचा वापर करू लागलो व आंतरजालाचा जास्तीत जास्त उपयोग करू लागलो व आताही स्मार्ट फोनचा वापर तितक्याच उत्साहाने करू लागलोउलट पूर्वी माझ्याचप्रमाणे अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करत असताना मोठा रस घेऊन संगणकावरप्रोग्रॅमिंग करणारे माझे मित्र मात्र आता संगणकावर साधा ईमेल करायचा विचार करत नसत व "आम्ही नाही बुवा त्या संगणकाच्या वाटेस जात असं काहीसं तुच्छतेने म्हणत अजूनही Whatsapp न वापरणारे माझे मित्र या प्रकारात मोडतात. आमच्यासारखे आता जुन्या काळात मोडणारे असा विचार करतात हे जरी अयोग्यच असले तरी काही तरुण पिढीतले लोकही यात समाविष्ट होतात ही आणखी नवलाची गोष्ट. म्हणजे एकीकडे सेल्फी काढून अपघातग्रस्त होणारे अतिरेकी या नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करतात तर त्यांच्यातलेच काही "मी नाही त्यातली/ला" असे म्हणतात याचे आश्चर्य वाटते.

त्यातील काही"इतका वेळ आम्हाला नाही " असेम्हणतात तेव्हां त्यासाठी वेळ घालवलाच पाहिजे असे नाही पण त्या सोयीचा योग्य तेवढा वापर करायला काय हरकत आहे असे मी सुचवले तरी त्याना ते मान्य नसते. माझा अमेरिकेच्या वारीत मित्र बनलेला समवयस्क मित्र अजूनपर्यंत तरी मोबाइल वापरत नव्हता अगदी अमेरिकेत असतानासुद्धा, याचे मला आश्चर्यच वाटते

आता तर त्याने ग्रीन कार्डही केले आहे . (त्याच्या मुलांनी त्यांच्यावर मोबाइल फोन बाळगण्याचे बंधन आता घातले असेल असे वाटते कारण तेथे तर त्यावाचून संपर्क साधणे अवघडच होते. कदाचित कोणत्याही यांत्रिक शक्तीवर चालणाऱ्या साधनांवर बहिष्कार टाकणाऱ्या अमेरिकेतील "आमिश" या जमातीचा आदर्श त्याच्यासमोर असेल. अमेरिकेच्या आमच्या एका भेटीत पेनसिल्वानियातील आमिश वसाहतीस मुद्दाम भेट दिली तेव्हां आम्हाला अनेक वर्षानंतर घोडागाडीने फिरण्याचा योग आला. एक दिवसापुरते ते बरे वाटले तरी संपूर्ण जीवन कोणत्याही यांत्रिक अवजारांचा वापर न करता काढण्याची शिवाय एक तत्त्व म्हणून तरी अशी जीवनपद्धतीच स्वीकारणे ही कल्पनाही करणे अवघड वाटते पण तशी जीवनपद्धती स्वीकारणारी निदान एक पूर्ण वसाहतच तेथे आहे आणि त्यामधील सर्वच लोकांची ती जीवनशैलीच आहे पण आमच्या मित्रासारखे स्मार्ट फोन्सचा सुळसुळाट असलेल्या जगात राहूनही अश्या काही गोष्टी न वापरण्याचा हट्टाग्रह करणाऱ्यांना काय म्हणावे समजत नाही.



# १३. काय भुललासी ---!

काणेकरांच्या बऱ्याच लघुनिबंधात स्वत: ते आणि बरोबर गणूकाका असे एक पात्र असे. व या दोघांची जुगलबंदी त्या लघुनिबंधात असे. "काळेपणा, गोरेपणा आणि सौंदर्य" या शीर्षकाचा त्यांचा एक लेख आमच्या पाठ्यपुस्तकात होता. या लेखात गणू काका अगदी ठार काळे तर लेखक त्यामानाने उजळ. गणूकाकांच्यामते काळे लोक स्वच्छ रहाण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. कारण त्यांना (यातून त्यांचा हीनगंडच दिसून येतो ही गोष्ट वेगळी) थोड्याश्या अस्वच्छतेमुळे आपण अधिकच अस्वच्छ दिसू अशी भीती वाटत असते. गोऱ्या लोकांच तसं नसतं, कारण त्यांना वाटत असतं की आपण थोडेफार अस्वच्छ असलोच तर आपल्या गौर वर्णाच्या बळावर निभावून नेऊ. या त्यांच्या मतावर लेखक त्यांना चिडवण्यासाठी आपला अभिप्राय व्यक्त करताना म्हणतात, "पण काका, उलट असे नाही का म्हणता येणार की आपल्या अंगावरील थोडीशी अस्वच्छताही चट्दिशी लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येईल म्हणून गोरे लोकच अधिक स्वच्छता पाळत असावेत? " यावर निबंधाचा शेवट





करताना काणेकर लिहितात, "माझ्या या बोलण्यावर काकांनी माझ्याकडे अशा दृष्टीने पाहिले की "मूर्ख आहेस तू! माझे सिद्धान्त तुला काय कळणार?" हाच त्या दृष्टीचा अर्थ होता.

यातील विनोदाचा भाग सोडला तरीही तरीही गोऱ्या रंगाचे आकर्षण आपल्याला असते ही गोष्ट निश्चित! अगदी लग्नाच्या जाहिरातीतही वधूविषयीच्या अपेक्षांत "गौर वर्ण " ही एक अट महत्त्वाची असते. तर काळी मुलगी असेल तर तिचे पालक "गहू वर्ण" या सदरात तिला नोंदवून तिच्या गोरेपणाच्या जवळिकेची ग्वाही देण्यात कसूर करत नाहीत. अपेक्षांमध्ये तरी "मुलगी काळी असावी'असे कोणी म्हणत नाही. त्याचमुळे इंदू बिंदूच्या जोडीस गडकऱ्यांनी "रात्रीसुद्धा त्या (त्यांच्या त्याहूनही अधिक काळया वर्णामुळे) उठून दिसतील अशी ग्वाही देऊन जास्तीत जास्त हास्यास्पद केले आहे.

एकूण काळया रंगाविषयीचा हा दुजाभाव फार पूर्वीपासून आपल्या अंतर्यामी रुजला आहे. माझी आईसुद्धा मूल जन्माला आल्यावर ते काळे की गोरे हे त्वचेवर बोट टोचून पहात असे (असे केल्याने वरून काळे दिसले तरी तेवढ्या भागाची त्वचा थोडीफार पांढुरकी तरी दिसते)व बोटाखालील त्वचा उजळ दिसली की समाधान पावत असे असे तिनेच सांगितलेले आठवते. अर्थात त्या काळी अनेक मुले होत होती त्यामुळे हा प्रयोग तिला अनेक वेळा करावा लागला व कधी आनंद वा कधी दु:ख यांना सामोरे जावे लागले. पण तो प्रश्न त्यावेळी तेवढ्यापुरताच मर्यादित होता.



अलीकडे मात्र माध्यमाच्या विपुलतेमुळे व त्यातील जाहिरातींच्या सुकाळामुळे हा गोरे ( उजळ?)पणाचा प्रश्न अधिक तीव्रतेने ऐरणीवर आला आहे. शिवाय नको त्या गोष्टीत नाक खुपसणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांमुळे त्या प्रश्नाला नको तेवढे बटबटीत स्वरूप आले आहे. सध्या सगळया त्वचा उजळ करणाऱ्या पावडरी व लेप यांच्या जाहिराती करणाऱ्या सेलिब्रिटींवर "अभय देओल" या सेलिब्रिटीनेच धार धरली आहे व अश्या जाहिराती करून त्यांनी काळे गोरे वादास उत्तेजन देऊ नये असे आवाहन त्याने केले आहे. जाहिरातीमुळे मनोवृत्ती कितपत बदलते हा प्रश्न जरी वेगळा असला तरी जाहिरात करणाऱ्या किंवा करणारीची मनोवृत्ती तशी नसावी ही अपेक्षा चुकीची नाही.

या वर्णभेदाचा फटका अमेरिकेतील कृष्णवर्णियांनाही बसतो. तेव्हां त्यांचा धि:क्कार करण्यात आपण आघाडीवर असतो. अमेरिकेतील कृष्णवर्णियांवरील हल्ल्यास वंशभेदाचा व गुलामगिरीचा आणखी एक पदर आहे. पण आता अलीकडे भारतीय़ांवरही हल्ले होतात त्याचे कारण वर्ण हे नसले तरी या वर्णामुळे अमेरिकन व बाहेरचे हा भेद चटकन लक्षात येतो. व त्यामुळे हल्ले करण्यासाठी त्यांना लक्ष्य करणे सोपे जाते. या गोष्टीस वर्ण या गोष्टीबरोबरच आणखीही एक बाजू लक्षात घेण्यासारखी आहे . चिनी किंवा जपानी हेही रंगामुळे नाही तरी त्यांच्या रूपामुळे चटकन उठून दिसले तरी त्यांच्यावर हल्ले होत नाहीत कारण ते ज्या देशाचे नागरिक आहेत ते देश अमेरिकेला पुरून उरणारे आहेत अर्थातच येथे "बळी तो कानपिळी" हा नियमच लागू होतो,

उक्ती व कृती मधील दुतोंडी वृत्तीबद्दल भारतीयांचा हात कोणी धरू शकेल की नाही शंका आहे. आपले सगळे देव श्रीराम, श्रीकृष्ण, विठोबा श्यामवर्णीय असे आम्ही अभिमानाने सांगतो. श्यामल म्हणजे काळेच! विठोबाला तर काळ्या म्हणूनही हाक मारण्यात संतांनी धन्यता मानली आहे. आणि प्रत्यक्षात मात्र व्यक्तीचा रंग काळा असेल तर तिचा तिटकारा करण्यातही आपणही पुढेच असतो असे दिसून आले आहे. अमेरिकेत कृष्णवर्णीय तसेच अलीकडे भारतीयांवरही (अर्थात वेगळ्या कारणामुळे) हल्ले होतात यासाठी त्यांना नावे ठेवत आपणही कृष्णवर्णीयांवर (ते नायजेरियन आहेत म्हणून) हल्ले करून आपल्या मनातीलही संकुचित वृत्तीच उघड करतो. आणि आपले नेतेही"आम्ही असा भेदभाव करत नाही म्हणूनच दक्षिण भारतीयांना सामावून घेतले आहे" असा अगदी मनातली संकुचित वृत्ती दाखवणारा अभिप्राय व्यक्त करून एकूणच आपले कल्पना दारिद्र्य दाखवतात. आता आषाढी वारीत ज्ञानोबा तुकारामाचा गजर करतानाआपण मात्र चोखोबांच्या "काय भुललासी वरलीया रंगा " या उक्तीच्या बरोबर उलट प्रत्यक्ष व्यवहारात वागतो . हा उक्ती आणि कृतीमधील दुटप्पीपणा दूर व्हायला हवा. रंग माझा वेगळा" नावाच्या मालिकेत या वृत्तीचा समाचार घेतला आहे, पण तेवढ्याने काही बदल होईल ही शक्यता कमीच!





# १४. स्पिनोझाचा देव

अमेरिकेतील अनेक विद्यापीठात भरणाऱ्या वैज्ञानिक सम्मेलनात हजर रहाताना आइनस्टाइनला एका प्रश्नास हटकून तोंड द्यावे लागे आणि तो म्हणजे "तुमचा देवावर विश्वास आहे का? Do you believe in God?" आणि तो नेहमी उत्तर द्यायचा "हो, स्पिनोझाच्या देवावर माझा विश्वास आहे, "स्पिनोझा हा एक डच तत्त्वज्ञ धर्माने ज्यू होता, त्याकाळात रेने देकार्त या फ्रेन्च तत्त्वज्ञाबरोबर त्याचाही एक विवेकवादी तत्वज्ञ म्हणून बोलबाला होता.. सतराव्या शतकात ॲमस्टरडॅम येथील एका यशस्वी पण फार श्रीमन्त नसणाऱ्या उद्योजकाचा हा मुलगा! स्पिनोझाच्या मते देवाची कल्पना अशी होती.

देव असे म्हणत असणार, "उगीचच आपले उर बडवीत माझी प्रार्थना व पूजा करू नका. उलट जरा बाहेर नजर टाका आणि मी तुमच्यासाठी काय काय केले आहे त्याचा उपभोग घ्या. तुम्ही मौज करावी, गाणी म्हणावीत मी तुमच्यासाठी जे निर्माण केले आहे त्याचा उपभोग घ्या आणि त्याची मजा लुटा. त्या अंधुक प्रकाशाने भरलेल्या, थंड, उदास देवळात (चर्च) ज्याला तुम्ही माझे

घर समजता; जायचा विचारही करू नका. माझे घर आहे मोठमोठ्या पर्वतशिखरात, झुळझुळ वाहाणाऱ्या नद्यांत, सरोवरात, अफाट पसरलेल्या समुद्रकिनाऱ्यावर. या जागा आहेत जेथे माझे वास्तव्य आहे आणि तेथेच माझे तुमच्यावरील प्रेम मी व्यक्त करत असतो. आपले आयुष्य जर दुःखी असेल तर त्याबद्दल मला दोष देणे बंद करा, तुम्ही पापी आहात असे मी कधीच म्हणत नाही. उगीचच मनात भीती बाळगू नका. मी काही तुमच्या कृत्यांचा जाब विचारायला बसलो नाही. त्यामुळे तुमच्यावर टीका करायचा किंवा तुमच्यावर रागावण्याचा विचारही माझ्या मनात येत नाही. मला कशाचेच सोयर सुतक नाही, तुम्हाला शिक्षा करायला मी बसलो नाही. मी म्हणजे केवळ प्रेमाचा सागर आहे,

उगीचच माझ्याकडून क्षमायाचना करू नका. क्षमा करण्याचा प्रश्नच कुठे उद्भवतो? तुमच्या भावना, आकांक्षा, आनंद. गरजा, मर्यादा, वर्तनातील विसंगती या सर्व तुमच्या ठायी मीच निर्माण केलेल्या असताना त्याबद्दल मी तुम्हाला कसा दोष देणार आणि कशी तुम्हाला शिक्षा करणार?. माझी सर्व लेकरे तुम्ही आहात. जी अयोग्य वागतील त्याना पुढील अनंत काळापर्यंत उकळत्या तेलात किंवा धगधगत्या ज्वालात टाकण्याची शिक्षा देण्यासाठी एकादी जागा मी तयार केली आहे असा तुमचा समज असेल तर तो चुकीचा आहे.

माझ्या काही आज्ञा किंवा कायदे आहेत असे मुळीच समजू नका. तुमच्या मनात उगीचच अपराधीपणाची जाणीव त्यामुळे निर्माण होते. आपल्या वडीलधाऱ्यांचा मान राखा आणि आपल्याला त्रास होऊ नये असे तुम्हास वाटते





तो उपद्रव आपल्यामुळेही इतरांना होणार नाही याची काळजी घ्या. फक्त एकच गोष्ट मला अपेक्षित आहे ती म्हणजे केवळ आपल्या आयुष्याविषयी दक्ष रहा, ही दक्षताच तुमचा मार्गदर्शक आहे. हे आयुष्य म्हणजेच सर्व काही आहे आणि तेवढेच तुम्हाला आवश्यक आहे. मी तुम्हाला पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे . त्यात तुम्हाला काही बक्षीस मिळणार नाही की शिक्षाही होणार नाही. पाप किंवा पुण्य असे काही नसते, तुमच जीवन हेच स्वर्ग किंवा नरक बनवण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला आहे.

या आयुष्यानंतर पुढे काही आहे की नाही हे मी सांगणार नाही पण यानंतर असे काही नाही असे समजूनच चाला जे काही आनंद उपभोगणे, प्रेम करणे करायचे आहे त्यासाठी हीच एक संधी आहे. तुमची काही तक्रार नसेल तर मी दिलेल्या संधीचा तुम्ही पूर्ण फायदा घेतलात असे मी समजेन. आणि काही असेलच तरी मी काही तुम्हाला विचारणार नाही की तुम्ही चांगले वागलात किंवा नाही. मी फक्त विचारेन की तुम्ही आयुष्याचा आनंद लुटलात की नाही?तुम्हाला ते आवडले की नाही. मजा आली का तुम्हाला. त्यात जास्त मौज कशात आली. तुम्ही काय शिकलात?

माझ्यावर विश्वास ( टाकून निष्क्रीय राहणे) टाकणे सोडा. कारण तसे करणे म्हणजे काहीतरी अध्याहृत धरणे, कल्पना करणे . जेव्हां आपल्या प्रिय व्यक्तीचे चुंबन घ्याल तेव्हां माझी जाणीव तुम्हाला व्हावी. आपल्या छोट्या मुलीबरोबर तुम्ही खेळत असाल, किंवा आपल्या कुत्र्याच्या पिल्लाला कुरवाळत असाल किंवा समुद्रात स्नान करत असाल तेव्हां माझी जाणीव तुम्हास व्हावी.



माझी स्तुती करण्याचे कारण नाही. स्वत:ला कुणीतरी मोठा समजणारा प्राणी मी आहे असे का वाटते तुम्हाला?तुमच्या स्तुतिस्तोत्रांनी मला अगदी कंटाळा येतो. खरच माझ्याविषयी इतक वाटतं ना?तर ते प्रत्यक्ष स्वत:ची, सभोवतालच्या जगाची काळजी घेऊन व्यक्त करा. तुमचा आनंद व्यक्त करा ती माझी खरी स्तुति ठरेल. एकच सत्य आहे ते म्हणजे तुम्ही येथे आहात, आणि हे जग अनेक आश्चर्यांनी भरलेले आहे. आणखी मग काय हवं तुम्हाला आणखी स्पष्टीकरणाची आवश्यकताच काय?मी कोठेतरी बाहेर आहे असे समजून मला शोधू नका तुमच्या आत मी आहे हे निश्चित समजा. तुमच्या हृदयाच्या ठोक्यात मी आहे. बरुच डी स्पिनोझा------ तुकोबानी तरी दुसरे काय सांगितले आहे?

देह देवाचे मंदीर।

आत आत्मा परमेश्वर “

(मूळ इन्ग्रजी लेखाचा शब्दश: अनुवाद)



# १५.. चड्डी आणि भारतीय अर्थव्यवस्था

(एक अतिशय क्षुल्लक आणि एक राष्ट्रीय महत्वाची अशा दोन गोष्टींची सांगड कशी काय बसते असा प्रश्न शीर्षक वाचल्यावर पडू शकतो )

कधी कधी सौ. च्या दूरदर्शित्वाचे फारच कौतुक करावेसे वाटते. मात्र माझे कौतुक करणे हे सुसरबाई तुझी पाठ मऊ या प्रकारातले असते हा तिचा दावा (किंवा आरोप)! खरे तर कधी कधी हा शब्दही वापरणे तसे अयोग्यच ठरेल कारण ती नेहमीच खूप पुढचा विचार करून माझ्या (किंवा कोणाच्याही ) फायद्याचंचं बोलत असते असा तिचा दावा जो तिच्या समोर तरी अमान्य करणे मला शक्य (आणि योग्यही) नसते. तरीही असे कौतुक खरोखरच करावे वाटण्याचे कारण जो निष्कर्ष परवाच एका वाहिनीवरून प्रसारित झालेल्या बातमीतून निघत आहे तो तिला फार पूर्वीपासून लक्षात आलाहोता हे माझ्या निदर्शनास आले हे ! त्या बातमीनुसार भारतीय अर्थकारणाचा आणि भारतातील सर्व पुरुषांचा (ज्यात मीही आलोच! )प्रत्यक्ष संबंध आहे. !. नेहमीच वाहिन्यावर प्रसारित होणाऱ्या बातम्या ऐकून पण फारश्या अंगाला लावून न घेता मी सोडून देतो पण या बातमीत प्रत्यक्ष माझ्या अंगाचाच संबंध असल्यामुळे ती अंगाबाहेर





टाकणे मला शक्य नव्हते. या बातमीचा माझ्या क्रयशीलतेशीही संबंध होता (किंवा आहे असेही म्हणता येईल).

लग्नानंतर प्रत्येक स्त्रीला तिच्या वडीलधाऱ्यांकडून मिळणाऱ्या "अखंड सौभाग्यवती भव" याबरोबरच "अखंड क्रयवती भव" असा आशीर्वादही आमच्या सौ. ला मिळाला असावा. हल्ली अश्या आशीर्वादासाठी वाकणाऱ्यांची आणि त्यामुळे देणाऱ्यांची संख्याही घटत चालली आहे. (त्यातले एक कारण "अष्टपुत्रा सौभाग्यावती भव "असा आशीर्वाद बऱ्याच जणांनी आचारात आणल्यामुळे झालेले गंभीर परिणाम?पण असा आशीर्वाद न मिळताही आचरणात आणणारे अजूनही काही आहेतच असो!)तिची लहानसहान खरेदी सदैव चालू असते बरीच खरेदी अमेरिकेला जाताना बॅगा भरतानाच किंवा अचानक घरी येणाऱ्या नव दांपत्याच्या किंवा अश्याच एकाद्या नात्यातील बालकाच्या हातावर ती एकादी वस्तू ठेवते तेव्हांच मला समजते. तरीही अमेरिकेला जाताना मला अनेक वस्तू माझ्यासाठीही खरेदी करण्याची आज्ञा ती करते इतकेच काय माझ्यासाठी खरेदी करण्याचीही तयारी दाखवते, त्याचा मला राग येतो! त्याचे मुख्य कारण : त्या खरेदीत ती माझ्या चड्ड्या व बनियन यांचाही समावेश करत असते. तरीही हिला काय करायचेय माझ्या नको त्या गोष्टीत लक्ष घालून असा त्रागा न करता"येवढी काय आवश्यकता आहे?" असा सूर मी काढताच त्या विषयावरील तिचे स्पष्टीकरण ऐकल्यावर जगातील सर्व पुरुष जातींविषयी जणु ती बोलत असते हे लक्षात येते आणि त्या





बातमीमागील अर्थ(शास्त्र) ध्यानात घेता ही गोष्ट इतक्या पूर्वीच तिला सुचली होती याबद्दल तिचे कौतुक करावे वाटते.

ती बातमी भारतीय अर्थव्यवस्था मंदावत असण्याविषयी आहे. अर्थात अर्थव्यवस्थेचे हे निदान एके काळचे अर्थमंत्री पी चिदंबरम् यांना योग्य वाटले तरी बऱ्याच मनोगतींना (विशेषत: नमोगतींना)पटेलच असे नाही. (हा लेख प्रथम मनोगत या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला होता )घरातील जीवनावश्यक खरेदीपैकी दररोज वा क्वचित एक दिवसा आड आणाव्या लागणाऱ्या अर्धा लिटर दुधापलिकडे आर्थिक व्यवहार न करणाऱ्या मला तर देशाच्या आर्थिक स्थितीविषयी बोलण्याचा अधिकारच पोचत नाही. त्यामुळे ही बातमी उद्धृत करण्यापुरताच माझा सहभाग आहे असे मी (तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता च्या थाटात) म्हणू शकतो. पण माझ्या बायकोचा विचार मात्र केवळ माझ्यापुरता मर्यादित नसून भारताची अर्थव्यवस्था सुधारणे इतक्या महत्वाच्या विषयाची दखल घेणारा होता हे त्या बातमीमुळे मला आत्ता समजतेय.

त्या बातमीनुसार पुरुषांच्या अंतर्वस्त्रांच्या खपाचा राष्ट्राच्या आर्थिक स्थितीशी प्रत्यक्ष संबंध आहे.. भारतात हा खप कमी होत आहे. माजी US Federal Reserve Board Chairman ग्रीनपीस यानी पुरुष अंतर्वस्त्रांबाबतीतMen's underwear Growth Index हा सिद्धान्त इ. स. १९७० इतक्या पूर्वी मांडला आहे. त्या सिद्धांताच्या प्रकाशात भारताची अर्थव्यवस्था उतरणीस लागली आहे. असा निष्कर्ष ग्रीनपीस यांनी काढला



आहे. कारण या सिद्धांतानुसार कोणत्याही देशातील पुरुषांच्या अंतवस्त्रांचा खपावरून त्या देशाच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज करता येतो. जून २०१९ पर्यंतच्या तिमाहीत भारतात पुरुष अंतर्वस्त्राच्या खपात लक्षणीय घट झाली आहे. विशेषत:: या दहा वर्षातील हा सर्वात कमी खप आहे. जॉकी ब्रॅन्डचा खपया वर्षी फक्त २% नी वाढला व या दशकातील ही सर्वात कमी वाढ आहे. तर डॉलर व व्ही. आय. पी. ब्रॅन्डच्या अन्तर्वस्त्रांचा खप अनुक्रमे ४% व २०% नी घटला आहे. लक्स चा खप अगदी नसल्यातच जमा आहे. (Ref:Economic Times Indian Times. com ),

आता प्रश्न उद्भवतो की अन्तर्वस्त्रांचा विचार करताना फक्त पुरुषांचीच का स्त्रियांची का नाही?यावर विचार करता मलाच असे जाणवले की अंतर्वस्त्रात काय किंवा एकूणच वस्त्रात काय काटकसर करणे पुरुषालाच शक्य असते. (बाह्य वस्त्रात बऱ्याच स्त्रिया अलीकडे खूप काटकसर करताना दिसतात ते वेगळे ) पुरुषांना त्याबाबतीत आदर्श समर्थानीच घालून दिला आहे. इतक्या पूर्वीचे कशाला अगदी चाळीस पन्नासवर्षापूर्वी मातृभोजनासाठी कोणाच्याही मुंजीत मुंजे म्हणून जेव्हां आम्हाला निमंत्रण असे तेव्हां बरेच मुंजे अगदी फक्त लंगोट्या लावून येत असत. तशी अंतर्वस्त्रासाठी होजिअरी वापरण्याची चैन अलीकडल्या काळातीलच नाहीतर पैलवानी लंगोट हीच पुरुषाच्या अंतर्वस्त्राची परिसीमा होती. बनियन सुद्धा कापडी (त्यास कोपरी किंवा बंडी असे गावाकडे म्हणतात ) वापरण्याची पद्धत काही ठिकाणी अजूनही रूढ आहे. याउलट स्त्रिया बाह्यवस्त्रात कदाचित काटकसर करत असतील आणि ते फॅशनचे लक्षणही



मानावे लागेल पण अंतर्वस्त्राबाबतीत पुरुषांवर मात करणे त्यांना शक्य नाही हे निश्चित!

खरे पाहता पुरुष बालकाच्या हव्यासापोटी भारतातील अनेक राज्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण घटत आहे म्हणजे एकूणात त्यांच्या अंतर्वस्त्र खरेदीचा खप कमी व्हायला हवा पण परिस्थिती उलटी असेल तर खरे म्हणजे एकूणच वस्त्रखरेदीबाबत---- त्यातही अंतर्वस्त्राबाबतीत तर अधिकच ----पुरुष पूर्वीपेक्षाही उदासीन किंवा काटकसरी बनत चालले आहेत असा निष्कर्ष काढणे योग्य ठरेल या परिस्थितीला आणखी एक बाब कारणीभूत आहे ती म्हणजे ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण! ते वाढत असल्याने व (माझ्यासारख्या)ज्येष्ठ नागरिकांना एकूणच कपडे खरेदी करण्यात फारसा रस नसल्यामुळे आणि अंतर्वस्त्रे तर इतरांना दिसतही नसल्यामुळे त्यांचा जास्तीत जास्त वापर करूनच त्याना मोडीत काढणे शक्य होत असल्यामुळे---त्यांच्या खरेदीचे प्रमाण आणखीनच कमी होणे स्वाभाविक आहे त्यामुळे त्या घटनेचा एकदम देशाच्या आर्थिक परिस्थितीशी संबंध लावणे कितपत योग्य ठरेल शंकाच आहे. पण तसा असेल तर त्यासाठी माझ्या पत्नीचा ( नवऱ्याला अधिक अंतर्वस्त्रेखरेदी करण्याचा आग्रह धरण्याचा )आदर्श सर्व बायकांनी ठेवणे इष्ट म्हणजे तरी आपल्या देशाच्या आर्थिक परिस्थितीविषयी असा निष्कर्षकाढता येणे शक्य होणार नाही.

---------------------------------------------------



## ई साहित्य प्रतिष्ठान पंधराव्या वर्षात पदार्पण करत आहे

## श्री श्याम कुलकर्णी यांचे हे आठवे पुस्तक.

श्री श्याम कुलकर्णी हे इंजिनियरिंगचे शिक्षक. पण त्यांचे खरे गुरू पुलं च. समोरच्या परिस्थितीने कितीही छळ करायचे म्हटले तरी त्यातली विसंगती शोधून हे स्वतःचे मन रिझवणार आणि भोवतालालाही अपल्या खुसखुशीत विनोदाने मजेत ठेवणार. त्यांच्या लेखनातला विनोद हा दर्जेदार, नेमका आणि अत्रेंनी विनोदातल्या व्याकरणात ज्याला सर्वोच्च म्हटले आहे त्या प्रकारचा. याचे कारण त्यांचा बहुतांश विनोद हा स्वतःचीच खिल्ली उडवणारा असतो. किंचित अतिशयोक्तीची फ़ोडणी असेल, पण मुख्य गाभा वास्तवातल्या विसंगतीचा. पण केवळ विनोदापुरतेच त्यांचे आणि पुलंचे नाते नाही. संगीताचा निकोप आस्वाद आणि मनसोक्त दाद यांही बाबतीत त्यांचे नाते पुलंशी जुळते.

श्री. श्याम कुलकर्णी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३६), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे



(ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(१९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(९), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(११) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक, मंगेश चौधरी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.


**आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।**
**दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।**




श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची पुस्तकं.

यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.


(इंटरनेट पाहिजे हो. नाहीतर उघडणार नाही)















बुध कौशिक ऋषी
विरचित
रामरक्षा
मराठी समश्लोकी
श्याम कुलकर्णी


॥ श्रीगणपत्यथर्वशीर्षोपनिषद् ॥
मराठी समश्लोकी श्याम कुलकर्णी